दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com

Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ शुक्रवार, दि. ०४ सप्टेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १३५ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028


## एकामागून एक 4 मुलांचा मृत्यू

**मध्य प्रदेश :** मध्य प्रदेशातील शिवपुरी जिल्ह्यातून एक मन हेलावून टाकणारी आणि अत्यंत रहस्यमय घटना समोर आली आहे. एका कुटुंबातील १६ सदस्य पिकनिकसाठी धबधब्यावर गेले होते, मात्र तिथून परतल्यानंतर उद्भवलेल्या अनाकलनीय आजारपणामुळे अवघ्या १० दिवसांच्या कालावधीत कुटुंबातील चार निष्पाप मुलांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये तीन सख्ख्या भावांचा आणि एका नातेवाईकाच्या मुलाचा समावेश आहे. या हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, सध्या कुटुंबातील इतर तीन मुलींची प्रकृतीही अत्यंत चिंताजनक असल्याने प्रशासनाची धावपळ उडाली आहे.

## राज्य शासनाकडून 11 सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई :** राज्य शासनाने बुधवारी भारतीय प्रशासकीय सेवेतील (आयएएस) ११ अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले. सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र खेबुडकर यांची पुणे येथील भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या आयुक्तपदी बदली करण्यात आली आहे. त्यांच्या रिक्त जागी पालघर येथील जव्हारच्या प्रकल्प अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी डॉ. अपूर्वा बासूर यांची सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## थोडक्यात वार्ता

### नेपाळमध्ये अडकलेले 54 भारतीय सुखरूप मुंबईत दाखल

**मुंबई :** नेपाळमधील महापुरामुळे चीन-नेपाळ सीमेवर अडकलेले कैलास मानसरोवर यात्रेतील ५४ भारतीय भाविक अखेर सुखरूप मुंबईत दाखल झाले. गुरुवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर त्यांचे आगमन झाले. यावेळी शिवसेनेचे सरचिटणीस तथा माजी खासदार राहुल शेवाळे, आमदार मंगेश कुडाळकर, आमदार मुरजी पटेल आणि शिवसेना पदाधिकाऱ्यांनी भाविकांचे स्वागत केले. मिठाई भरवून आणि गुलाबपुष्प देत शेवाळे यांनी भाविकांशी संवाद साधला. भाविकांनी महाराष्ट्र शासन, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि राहुल शेवाळे यांचे आभार मानले. २२ ऑगस्टला कैलास मानसरोवर यात्रेसाठी नेपाळमध्ये गेलेला हा ५४ जणांचा समूह महापुरामुळे सीमेवर अडकला होता. माहिती मिळताच राहुल शेवाळे यांनी भाविकांशी संपर्क साधला. त्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह त्यांनी व्हिडिओ कॉलद्वारे भाविकांना धीर दिला. महाराष्ट्र सरकार, भारतीय दूतावास आणि नेपाळ दूतावासाच्या समन्वयातून विशेष व्यवस्था करून भाविकांना काठमांडू येथे आणण्यात आले. त्यानंतर गुरुवारी विमानाने त्यांची सुखरूप मुंबईत घरवापसी झाली.

### 65 एकरांच्या धरण प्रकल्पातील ब्लास्टिंगचा धसका

**रायगड :** कर्जत तालुक्यातील भिवपुरी कॅम्प ग्रामपंचायत हद्दीतील धनगरवाडी आणि तापकीरवाडी परिसरात सुरू असलेल्या टाटा पॉवर कंपनीच्या धरण बांधकाम प्रकल्पातील ब्लास्टिंगमुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या दीड वर्षांपासून प्रकल्पाच्या सुमारे ६५ एकर परिसरात खोदकाम सुरू असून, वारंवार होणाऱ्या स्फोटांमुळे घरांना हादरे बसत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. याप्रकरणी ग्रामस्थांनी कर्जत पोलीस ठाण्यात सामूहिक लेखी तक्रार दाखल करून ब्लास्टिंग तातडीने थांबविण्याची मागणी केली आहे. ग्रामस्थांच्या निवेदनानुसार, रविवारी (३० ऑगस्ट) दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास प्रकल्प परिसरात मोठ्या प्रमाणात ब्लास्टिंग करण्यात आले. या स्फोटाची तीव्रता एवढी होती की, परिसरातील घरांना जोरदार हादरे बसले. ब्लास्टिंगवेळी वापरण्यात येणाऱ्या रबर मॅटचा मोठा तुकडा तब्बल दोन ते तीन किलोमीटर अंतरापर्यंत उडून गेल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून अपेक्षित दखल घेतली जात नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

### सुनेत्रा पवार भावुक; म्हणाल्या, 'याचं राजकारण करू नका'

**पुणे :** अजित पवारांच्या अपघातावर सुनेत्रा पवार भावुक; म्हणाल्या, 'याचं राजकारण करू नका'"अजितदादांच्या जाण्याने संपूर्ण महाराष्ट्रात जी पोकळी निर्माण झाली आहे ती किती आहे हे माझी मुलं आणि माझ्यापेक्षा कुणाला जास्त माहिती असणार त्यामुळे अजितदादांच्या अपघाताचे राजकारण करु नका" अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना विरोधकांना सुनावले आहे. दादांच्या अपघातानंतर काहीतरी ठोस निर्णय आला पाहिजे हे सर्वांना वाटत आहे आणि आम्हीही त्यादृष्टीने प्रयत्न करत आहोत. आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना भेटून आलो आहोत हे सर्वांना माहित आहे. मुख्यमंत्र्यांनी अधिवेशनात शब्द दिला आहे. तो शब्द पाळण्यासाठी कसोशीने ते प्रयत्न करत आहेत. तपास यंत्रणा आपलं काम करत आहेत. माझा यंत्रणांवर, कायदा, संविधानावर विश्वास आहे. त्यामुळे त्यांनाही आपण वेळ दिला पाहिजे असेही सुनेत्रा पवार यावेळी म्हणाल्या.

### "शाल जोडे"




# फर्दापूरकरांच्या जीवाशी भयंकर खेळ! पाण्याची तपासणी कधी होणार लोक मेल्यावर का

### पाणी तपासणीसाठी नेऊन 10 दिवस उलटले तरी अहवाल गुलदस्त्यात डॉ. पवन पवार यांची वरिष्ठांकडे बोट दाखवत उडवाउडवी सरकारी डॉक्टर एखाद्या मोठ्या साथीची अन् बळीची वाट पाहत आहेत का

फर्दापूर प्रतिनिधी शेख हक्कानी

फर्दापूरमध्ये सध्या प्रशासकीय अनास्थेचा कळस गाठला गेला असून सरकारी यंत्रणा इथल्या सामान्य नागरिकांच्या जीवाशी अत्यंत निर्दयीपणे खेळत असल्याचे उघड झाले आहे नागरिकांना पिण्यासाठी मिळणारे पाणी शुद्ध आहे की विषारी हे तपासण्यासाठी २४ ऑगस्ट रोजी पाण्याचे नमुने सॅम्पल तपासणीसाठी नेण्यात आले होते आज ३ सप्टेंबर उजाडला तब्बल १० दिवस उलटून गेले तरी या पाणी तपासणीचा कोणताही अहवाल आलेला नाही प्रशासन नक्की कोणती झोप काढत आहे असा संतप्त सवाल आता फर्दापूरकर विचारत आहेत

वरिष्ठांकडे बोट दाखवून डॉ. पवन पवार यांची जबाबदारी झटकण्याची धडपड

पाणी तपासणीच्या या गंभीर दिरंगाईबाबत जेव्हा स्वत प्रतिनिधीने डॉ. पवन पवार यांना फोन करून थेट जाब विचारला तेव्हा त्यांनी अत्यंत बेजबाबदारपणे आणि उडवाउडवीचे उत्तर दिले मी वरच्या डॉक्टरांना वरिष्ठांना सांगितले आहे अहवाल यायला अजून चार पाच दिवस लागतील असे सांगून त्यांनी चक्क वेळ मारून नेण्याचा आणि जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केला

म्हणजेच पाण्याचा साधा अहवाल यायला सरकारी यंत्रणेला १५-१५ दिवस लागतात का या १५ दिवसांत जर ते पाणी दूषित निघाले आणि तेच पाणी पिऊन गावात कॉलरा टायफॉइड किंवा गॅस्ट्रोसारखी जीवघेणी साथ पसरली तर याला जबाबदार कोण राहणार डॉ. पवन पवार त्यांचे वरिष्ठ आणि हे सुस्त प्रशासन स्वत जबाबदारी घेणार का

फर्दापूरकरांचे प्रशासनाला जळजळीत सवाल

लोक मेल्यावर अहवाल देणार का पाणी तपासणीचा अहवाल येण्यासाठी प्रशासन नक्की कशाची वाट पाहत आहे गावात साथ पसरून एखादा निष्पाप जीव गेल्यानंतर सरकारी यंत्रणा जागी होणार का

१५ दिवस लागणारी ही कोणती लॅब आहे आजच्या आधुनिक काळात पाण्याचा अहवाल २४ ते ४८ तासांत मिळतो मग फर्दापूरच्या पाण्याचा अहवाल द्यायला एवढे दिवस का लागत आहेत यात काही काळेबेरे तर नाही ना

सध्या पाणी प्यायचे की नाही जोपर्यंत पाण्याचा अहवाल येत नाही तोपर्यंत नागरिकांनी पाणी प्यायचे कसे आरोग्याचा धोका निर्माण झाल्यास सरकारी डॉक्टर उपचाराचा खर्च उचलणार का

तातडीने अहवाल द्या अन्यथा रस्त्यावर उतरू

सरकारी डॉक्टरांचा आणि प्रशासनाचा हा भोंगळ कारभार आता अजिबात खपवून घेतला जाणार नाही जर येत्या २४ तासांत पाण्याचा अहवाल सार्वजनिक केला नाही आणि पाण्याचे सत्य समोर आणले नाही तर फर्दापूरचे नागरिक रस्त्यावर उतरून संबंधित अधिकाऱ्यांच्या दालनातच तेच दूषित पाणी फेकून तीव्र जनआंदोलन छेडतील असा सज्जड इशारा संतप्त ग्रामस्थांनी दिला आहे

## परभणी कडकडीत बंद मनोज जरांगेच्या आंदोलनाला पाठिंबा

### बंद काळात अत्यावश्यक सेवा सुरू, व्यापारी प्रतिष्ठाने बंद मध्ये सहभागी







हिंदू प्रकाश वार्ता अशोक पवार

**परभणी:-** मराठा आरक्षण चे प्रणेते व संघर्ष योद्धा मनोज जरांगे यांच्या समर्थनार्थ शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून या बंदच्या हाकेला व बंदच्या आव्हानाला शहरातील व्यापाऱ्यांनी आपापली दुकाने बंद ठेवली त्यामुळे प्रमुख बाजारपेठेसह विविध भागातील रस्त्यावर शुकशुकाट पाहायला मिळाला.

बंदचा फार मोठा परिणाम जाणवला असून सकल मराठा समाजाने वतीने परभणी शहरातील रॅली काढून दुकाने बंद ठेवण्याचे आवाहन करण्यात आले होते त्या आव्हानाला हाकेला ओ देत परभणी शहर नेहमी गजबजलेले असते अशा बाजारपेठेमध्ये अत्यावश्यक सेवेचे अतिरिक्त कुठलेही दुकान चालू नव्हते सर्व दुकाने बंद ठेवण्यात आली होती त्यामुळे विविध व्यवहारावर बंदचा फार मोठा परिणाम झाला असून अनेक व्यवसायिकांनी आपली प्रतिष्ठांनी स्वयं स्मृतीने बंद ठेवत म्हणून जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठीमा दर्शवला असल्यामुळे त्यामुळे शहरातील आर्थिक व्यवहार ठप्प झाले होते बंदच्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व शाळा व महाविद्यालय बंद ठेवण्यात आली.

त्यामुळे विद्यार्थ्यांचे नेहमीचे लगबग दिसून आली नाही आज जिल्हा संवर्धन मंडळाच्या वतीने इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांचे होणारी घटक चाचणी परीक्षा ही रद्द करण्यात आली आजचे नियोजित पेपर आता शनिवारी 5 सप्टेंबर रोजी घेण्यात येणार असून त्यामुळे बंदचा थेट परिणाम शैक्षणिक क्षेत्रावर झाला आहे शहरातील बंद झाली असल्याने बाजारपेठेत नेहमी वर्दळीच्या ठिकाणी गर्दी दिसली नाही कुठलाही अनुसूचित प्रकार घडून यासाठी शहरातील प्रमुख चौक बाजारपेठा व संवेदनशील ठिकाणी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला होता चौका चौकात पोलीस कर्मचारीयांनी चोख बंदोबस्त ठेवल्याने बंदच्या काळात कायदा व सुव्यवस्था राखणे यासाठी पोलीस प्रशासनाने सर्व पद्धतीने सहकार्य केले असून मनोज रंग यांच्या स्मरणात पुकारलेल्या बंदमुळे परभणी शहरातील व्यवहार शैक्षणिक आणि दैनंदिन जीवनावर नेहमीच्या रुटींवर फार मोठे चित्र पाहायला मिळाले असून परभणी शहरात ग्रामीण भागातील रोजगार मजूर येत असतात त्यांना दिवसभर काम केले तर संध्याकाळी खायला भाकरी मिळते अशा आंदोलनामुळे परिस्थिती बिकट होते आरक्षण सर्वांना मिळावे या भूमिकेसाठी मंजूर मजूर लोकांनी सुद्धा या बंदच्या प्रतिसादला संपूर्णपणे पाठिंबा दर्शवला होता.

## मराठा आरक्षणासाठी जिंतूर तालुका कडकडीत बंद

### जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा; बाजारपेठेसह व्यापारी प्रतिष्ठाने बंद



**जिंतूर :** मराठा समाजाच्या आरक्षणासह विविध मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या सुरू असलेल्या आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने गुरुवारी (ता. ३) जिंतूर तालुका बंद ठेवण्यात आला. शहरासह तालुक्यात बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. बाजारपेठेतील दुकाने व व्यापारी प्रतिष्ठाने कडकडीत बंद ठेवण्यात आल्याने शहरातील प्रमुख बाजारपेठेत शुकशुकाट दिसून आला.

मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न लाखो कुटुंबांच्या भवितव्याशी निगडित असून, सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागण्यांवर शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. जरांगे पाटील यांच्या उपोषणामुळे त्यांच्या प्रकृतीवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता असल्याने शासनाने तातडीने हस्तक्षेप करून मराठा समाजाच्या मागण्यांवर ठोस निर्णय घ्यावा, अशी भूमिका आंदोलकांनी व्यक्त केली. बंददरम्यान नागरिकांनीही उत्स्फूर्तपणे सहकार्य केले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांकडून खबरदारी घेण्यात आली. मराठा समाजाच्या रास्त मागण्यांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

* त ह सी ल दा रां मा र्फ त मुख्यमंत्र्यांना निवेदन*

बंदच्या पार्श्वभूमीवर सकल मराठा समाजाच्या वतीने मा.साहेब जिजाऊ चौक येथून अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज मोंढा परिसर, मेन चौक मार्गे तहसील कार्यालयापर्यंत मोटारसायकल रॅली काढण्यात आली. रॅली तहसील कार्यालयात पोहोचल्यानंतर नायब तहसीलदार प्रशांत राखे यांची भेट घेऊन त्यांच्यामार्फत मुख्यमंत्री यांना मराठा समाजाच्या विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

मराठा आरक्षणाचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाची शासनाने गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

## 'डीजे'च्या दणदणाटाला आता लगाम घाला!

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** सण-उत्सव, मिरवणुका आणि सार्वजनिक कार्यक्रमांच्या नावाखाली होणाऱ्या कर्णकर्कश ध्वनिप्रदूषणाला आळा घालण्यासाठी आता छत्रपती संभाजीनगरातही कठोर निर्बंध लागू करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. नागपूर शहरात उच्च क्षमतेच्या डॉल्बी, प्लाझ्मा व तत्सम ध्वनिक्षेपक यंत्रणा तसेच लेझर दिव्यांच्या वापरावर निर्बंध घालण्यात आले आहेत. त्याच धर्तीवर छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालयानेही शहरासाठी स्पष्ट आणि कठोर आदेश काढावेत, अशी मागणी रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगरचे अध्यक्ष रोटे. सीए मुकुंद पागे यांनी केली आहे.

सण-उत्सवांचा उत्साह वाढत असताना ध्वनिक्षेपकांचा आवाजही मर्यादेपलीकडे जात असल्याचे चित्र अनेक भागांत पाहायला मिळते. रात्री उशिरापर्यंत सुरू राहणाऱ्या कर्णकर्कश आवाजामुळे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, विद्यार्थी, रुग्ण तसेच निवासी परिसरातील नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते. अतितीव्र आवाजामुळे श्रवणशक्तीवर परिणाम होण्याबरोबरच झोपेचा व्यत्यय, मानसिक ताण, अस्वस्थता आणि चिडचिड यांसारख्या समस्या निर्माण होऊ शकतात.

मिरवणुका आणि सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये अतितीव्र लेझर दिव्यांचा वापरही वाढला आहे. हे दिवे थेट डोळ्यांवर पडल्यास दृष्टीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्याने लेझरच्या वापराबाबतही प्रशासनाने योग्य निर्बंध घालावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. "सण-उत्सव आनंद, भक्ती आणि सामाजिक सलोख्याचे प्रतीक आहेत. मात्र एका व्यक्तीचा किंवा मंडळाचा उत्साह हा दुसऱ्या नागरिकाच्या आरोग्याला त्रासदायक ठरू नये. नागपूरच्या धर्तीवर संभाजीनगरातही उच्च क्षमतेच्या ध्वनिक्षेपक आणि लेझर दिव्यांच्या वापराबाबत कठोर आदेश आवश्यक आहेत," असे रोटे. सीए मुकुंद पागे यांनी म्हटले आहे.

ही मागणी कोणत्याही एका धर्माच्या किंवा विशिष्ट सणाच्या विरोधात नसून सर्व धर्म, सर्व समाज आणि सर्व सण-उत्सवांसाठी नियम समान असावेत, अशी रोटरी क्लबची भूमिका आहे. धार्मिक व सांस्कृतिक परंपरांचा आदर राखतानाच नागरिकांचे आरोग्य, सुरक्षितता आणि शांततेचा अधिकार जपणेही आवश्यक असल्याचे पागे यांनी स्पष्ट केले.

रुग्णालये, शैक्षणिक संस्था, निवासी परिसर आणि घोषित शांतता क्षेत्रांमध्ये ध्वनीप्रदूषणाच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी. मर्यादेपेक्षा अधिक आवाज करणाऱ्या ध्वनिक्षेपकांवर कारवाई करावी आणि उत्सव मंडळांना सण सुरू होण्यापूर्वीच नियमांची माहिती द्यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

## गणेशोत्सवाच्या तयारीला वेग; महापौर समीर राजूरकरांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक

### मिरवणूक मार्गावरील खड्डे बुजविणे, मंडप परवानगीसाठी एक खिडकी योजना आणि विसर्जन व्यवस्थेवर भर

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी गुरुवारी महापौर समीर राजूरकर यांच्या अध्यक्षतेखाली गणेशोत्सव पूर्वतयारी बैठक घेण्यात आली. गणेशोत्सव काळात नागरिक, गणेश मंडळे आणि भाविकांना आवश्यक सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्यासह उत्सव सुरक्षित व नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यावर बैठकीत भर देण्यात आला.

यावेळी स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, सभागृह नेते गोविंद केंद्रे, नगरसेवक ऋषिकेश जयस्वाल, मनपा आयुक्त अमोल येडगे, अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, कल्पिता पिंपळे, शहर अभियंता संजय कोंबडे यांच्यासह सर्व कार्यकारी अभियंता, उपअभियंता आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत गणेशोत्सवाच्या अनुषंगाने मिरवणूक मार्गावरील खड्डे बुजविणे व पॅचवर्क, सार्वजनिक गणेश मंडळांना मंडप उभारणीसाठी तात्पुरत्या परवानग्या देण्यासाठी सुरू करण्यात आलेली एक खिडकी योजना, विसर्जन विहिरींची स्वच्छता व गाळ काढणे, कृत्रिम विसर्जन तलावांची व्यवस्था तसेच नवीन ठिकाणी कृत्रिम तलाव उभारण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

मिरवणूक मार्गावरील पॅचवर्कचे काम सुरू असताना संबंधित वार्ड अभियंत्यांनी प्रत्यक्ष स्थळी पाहणी करून कामाच्या गुणवत्तेची तपासणी करावी. काम दर्जेदार पद्धतीने पूर्ण झाल्याची खात्री केल्यानंतरच ते पूर्णत्वास न्यावे, अशा सूचना महापौर व पदाधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. गणेशोत्सवाशी संबंधित सर्व कामांना आवश्यक प्रशासकीय मान्यता तातडीने पूर्ण करण्याचे निर्देशही देण्यात आले.

मनपा आयुक्त अमोल येडगे यांनी सर्व विभागांनी आपापल्या जबाबदाऱ्या वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. मिरवणूक मार्ग, मंडप परवानगी, विसर्जन व्यवस्था, स्वच्छता आणि प्रकाशयोजनेत कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी. नागरिक व गणेश मंडळांना आवश्यक सुविधा वेळेत मिळण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे त्यांनी सांगितले.

दरम्यान, विसर्जनाच्या ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाल्यास विसर्जन प्रक्रिया बाधित होऊ नये, यासाठी जनरेटरची व्यवस्था करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच विसर्जनस्थळी पुरेशी प्रकाशयोजना करण्यावरही भर देण्यात आला.

## आरक्षणाच्या तांत्रिक त्रुटीची जबाबदारी निश्चित करा; याचिकाकर्ते डॉ. भागवत कराडकरांची कुलगुरूंना आक्रमक मागणी

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या पीएच.डी. प्रवेश परीक्षा (PET) २०२४ च्या प्रवेश प्रक्रियेत समांतर आरक्षण लागू करताना झालेल्या तांत्रिक आणि प्रशासकीय त्रुटींवरून विद्यापीठ वर्तुळात खळबळ उडाली असून, या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी याचिकाकर्ते डॉ. भागवत कराडकर यांनी कुलगुरूंना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. विद्यापीठाच्या २५ ऑगस्ट २०२६ रोजीच्या पत्रानुसार, आरक्षण तक्ता तयार करत असताना इतर मागासवर्गीय (OBC) संवर्गासाठी प्राप्त झालेल्या जागेवर समांतर महिला आरक्षण चुकून लागू करण्यात आले. या गंभीर तांत्रिक चुकीमुळे आरक्षणाच्या गणनेत मोठी विसंगती निर्माण झाली असून, याचा थेट आणि प्रतिकूल फटका डॉ. भागवत कराडकर यांच्या प्रवेशाला बसला. परिणामी, त्यांना आपल्या हक्कासाठी नाइलाजाने न्यायालयीन प्रक्रियेचा मार्ग पत्करावा लागला होता.



ही त्रुटी याचिकाकर्त्यामुळे नसून आरक्षण तक्ता तयार करणे, त्याची तपासणी करणे आणि अंतिम मान्यता देणे या प्रशासकीय प्रक्रियेतील अनास्थेमुळे घडल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरून स्पष्ट होते. अशा प्रकारच्या प्रशासकीय चुकीमुळे एका पात्र उमेदवाराच्या शैक्षणिक संधींवर आणि भवितव्यावर विपरीत परिणाम होत असल्याने, या प्रकरणी नेमकी कोणती तांत्रिक चूक झाली, प्रक्रियेत कोणकोणते अधिकारी सहभागी होते आणि कोणाच्या स्तरावर ही चूक घडली, याची सखोल चौकशी करून अहवाल तयार करावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

चौकशीत दोष सिद्ध झाल्यास संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर विद्यापीठाच्या नियमांनुसार कठोर शिस्तभंगाची किंवा प्रशासकीय कारवाई करण्यात यावी. तसेच या संपूर्ण प्रकारामुळे झालेला मानसिक त्रास, सोसावा लागलेला न्यायालयीन खर्च आणि प्रवेश प्रक्रियेत झालेला नाहक विलंब लक्षात घेऊन लागू नियमांनुसार योग्य ती नुकसानभरपाई देण्याबाबतचा निर्णय घेण्यात यावा, अशी आक्रमक भूमिका डॉ. कराडकर यांनी घेतली आहे.

भविष्यात अशा प्रकारच्या तांत्रिक चुकांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी समांतर आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी एक स्वतंत्र डिजिटल पडताळणी व क्रॉस-चेक प्रणाली सुरू करावी, तसेच आरक्षण तक्ता अंतिम करण्यापूर्वी सक्षम अधिकारी किंवा तज्ज्ञांकडून त्याची स्वतंत्र तपासणी करून घ्यावी, अशा महत्त्वाच्या सूचनाही करण्यात आल्या आहेत. याशिवाय, मा. उच्च न्यायालयाच्या ३१ ऑगस्ट २०२६ रोजीच्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनाने या प्रकरणात आतापर्यंत नेमकी काय काय कार्यवाही केली आहे, याची सविस्तर माहिती लेखी स्वरूपात उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# संपादकीय

## शिक्षण क्षेत्राला लागलेली भ्रष्टाचाराची वाळवी

ज्ञानदान करणाऱ्या आणि देशाची भावी पिढी घडवणाऱ्या शिक्षण क्षेत्रात घडलेला सुमारे १६० कोटी रुपयांचा 'शालार्थ आयडी घोटाळा' हा केवळ आर्थिक गैरव्यवहार नसून, राज्याच्या संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेला लागलेली भयंकर वाळवी उघडी करणारा प्रकार आहे. नाशिक विभागातून समोर आलेल्या या घोटाळ्यात रोज नवीन आणि धक्कादायक खुलासे होत आहेत. धुळ्यातील साक्री येथील एका शाळेच्या लॅब असिस्टंटला झालेली अटक आणि नाशिक जिल्हा न्यायालयाने त्याला सुनावलेली पोलीस कोठडी, यावरून या गुन्ह्याची पाळेमुळे किती खोलवर रुजली आहेत हे स्पष्ट होते. संगणक तंत्रज्ञानाचा गैरवापर करून, बनावट कागदपत्रे आणि बेकायदेशीर वैयक्तिक मान्यतांच्या आधारे शासनाचा करोडो रुपयांचा महसूल लाटण्याचे हे कारस्थान अत्यंत गंभीर आणि निंदनीय आहे. या संपूर्ण प्रकरणात सर्वाधिक चिंताजनक बाब म्हणजे सरकारी अधिकारी, संस्थाचालक आणि मध्यस्थांची अभद्र युती! तत्कालीन शिक्षणाधिकारी, वेतन पथक अधिकारी आणि संस्थाचालकांनी संगनमत करून शिक्षण विभागाची दिशाभूल केली. जिल्हा परिषदेच्या जावक रजिस्टरमध्ये थेट खाडाखोड करून बनावट आदेश घुसवण्यापर्यंत या टोळीची मजल गेली, यावरून प्रशासकीय पातळीवरील लाचखोरी आणि अकार्यक्षमता कोणत्या थराला पोहोचली आहे हे सिद्ध होते. एकट्या नाशिक विभागात ८४१ कर्मचाऱ्यांचे आयडी बनावट आढळणे आणि त्यापैकी ६३८ कर्मचारी जळगाव जिल्ह्यातील असणे, हे या घोटाळ्याची व्याप्ती आणि त्याचे सूत्रबद्ध जाळे दर्शवते. राज्य शिक्षण मंडळाच्या माजी अध्यक्षांपासून ते भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांपर्यंत अनेकांना झालेली अटक या प्रकरणाचे गांभीर्य अधिक वाढवते. तंत्रज्ञानाचा वापर हा पारदर्शकता आणण्यासाठी आणि भ्रष्टाचार रोखण्यासाठी केला जातो. परंतु, जेव्हा प्रशासनातीलच घटक तांत्रिक ज्ञानाचा वापर करून यंत्रणेत सिंडिकेट चालवतात, तेव्हा ती राज्याच्या व्यवस्थेसाठी अत्यंत धोक्याची घंटा असते. चार महिन्यांपासून फरार असलेल्या मुख्य अधिकाऱ्यांना अटक करण्यात पोलिसांना अद्याप यश आलेले नाही, ही बाब यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करते. विशेष तपास पथकाने (SIT) या प्रकरणाची सखोल चौकशी करून केवळ तात्पुरत्या आरोपींवर कारवाई न करता, या संपूर्ण साखळीचा पर्दाफाश केला पाहिजे. बनावट आयडीच्या आधारे लाटलेला प्रत्येक रुपया आरोपींच्या मालमत्तेतून वसूल झाला पाहिजे. शिक्षण क्षेत्रातील हा डाग पुसण्यासाठी आणि भविष्यात अशा भ्रष्टाचाराची पुनरावृत्ती रोखण्यासाठी दोषींवर कठोर आणि दाखला ठरण्यासारखी कारवाई करणे ही काळाची गरज आहे.

## "श्रीमंत थोरले बाजीराव यांचा पराक्रम"



श्रीमंत थोरले बाजीराव यांनी मराठा साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी अजरामर कार्य केले.तब्बल 40 युद्धे लढून ते अपराजित राहिले,या अजिंक्ययोद्धाची ही अचाट आणि अफाट कामगिरी इतिहास दुर्लक्षित राहिली.किंबहुणा त्यांना उपेक्षित ठेवण्याचा मुद्दाम प्रयत्न केला गेला. कारण मोजक्याच लेखकांचा अपवाद वगळता इतरांनी त्यांची माहिती केवळ आणि केवळ मस्तानी पुरतीच मर्यादित ठेवली.पण म्हणतात..ना इतिहास आणि पराक्रम कधीही दडवून राहत नाही,म्हणून "राऊं"चे अद्वितीय साहस आणि पराक्रम,मराठा साम्राज्य विस्ताराची धगधगती आग शमने अशक्यच!

मराठ्यांच्या पराक्रमाबद्दल इतिहास लेखनात थोरले बाजीराव अधिक उजवे ठरतात. कारण त्यांनी अठरापगड जातिंच्या सैन्य व सरदारांना एकत्र करत निजामांना नेस्तनाबूत करण्याची जी अभूतपूर्व कामगिरी केली त्यास तोड नाही.

विषय प्रवेश- श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे उर्फ विश्वनाथ बल्लाळ भट यांचा जन्म 18 ऑगस्ट 1700 साली डुबेरे(सिन्नर/नाशिक)येथे झाला. त्यांना जेमतेम 40 वर्षांचे आयुष्य लाभले.28 एप्रिल 1740 ला रावेरखेडी(मध्यप्रदेश) येथे ते निधन पावले.पण इतक्यात कमी कालखंडात त्यांनी केलेला महाप्रसाद छत्रपती शिवाजीमहाराज यांच्या हिंदवी साम्राज्य रूपांतरासाठी परिणामकारकच ठरला थोरले बाजीराव यांनी निजामी सल्तनतला जंग जंग पछाडले.ते सतत युद्धावर राहत .वर्षातील सहा-सहा महिने त्यांचा अश्विन व तलवार मराठा साम्राज्य रक्षण आणि विस्तारासाठी तळपत राहिली.

मग त्यांचा पांडवगड युद्धातील पराक्रम असो अथवा पालखेडची लढाई!बाळाजी विश्वनाथ भट अर्थात थोरले बाजीराव यांनी सर्वच युद्धात छत्रपती शिवाजीमहाराज यांच्या साम्राज्याचे हिंदवी स्वराज्यात रूपांतर करण्यासाठी अतुलनीय पराक्रम गाजवत महत्त्वपूर्ण योगदान देत जीवाची खर्या अर्थाने बाजी लावली. सततच "युद्धजन्य" असलेल्या बाजीराव यांचा हाच अफाट,अत्युच्च,अकल्पनीय पराक्रम महत्त्वपूर्ण ठरतो.इंग्रज इतिहासकार माऊंट गोमेरी यांनी "राऊं"चा उल्लेखन घोडदलाचा ईश्वरदत्त सेनापती असाच केला आहे,पालखेड येथील लढाईत बाजीराव यांनी गाजवलेल्या पराक्रममुळे प्रभावित होत या इतिहासकाराने वीर,धुरंधर बाजीराव यांच्या युद्धशास्त्रांवर या ग्रंथाचे लेखन केले होते.

शत्रूनेही केला सन्मान- 24 सप्टेंबर 1724 साली निजामाने त्यांचा "शाहमतपणाह " हा किताब देत गौरव केला.शौर्यवीर-रब्बूलनी म्हणजे मराठ्यांचे आराध्यदैवत असा याचा अर्थ!1739 साली थोरले बाजीराव पेशवे यांच्या अद्वितीय पराक्रमापुढे अवसान गळालेल्या इराणच्या नादिरशाह याने केलेले पलायन याचीच साक्ष देते.

बाजीराव यांनी निजाम या शत्रूसमोर प्रचंड धाक निर्माण केला होता.त्यांच्या मातोश्री राधाबाई या काशीप्रयागला तीर्थयात्रेला निघाल्यावर मोगलांकडून त्यांचा सन्मान करण्यात आला होता. चिमाजी अप्पा हे तर बाजीरावांचे कवचकुंडलच होत. देशभर शत्रूंसमोर या द्वयांची दहशत होती.साताराचे श्रीमंत शाहू महाराज यांना तुम्ही बाजीराव की 1 लाख सैन्य यापैकी कुणाचा स्वीकार करणार? याचे उत्तर क्षणार्धात महाराजांनी फक्त बाजीराव! असेच दिले होते.5 फेब्रुवारी 1727 साली शाहूमहाराज यांच्यासमोर संकट आले असता बाजीराव यांनी त्यांना मोलाची मदत केल्याची नोंद इतिहासात आहे.निजाम उल मुल्क सिद्धी हंशा (वय 57) यांस 27 वर्षांच्या बाजीरावाने जेरीस आणले होते.

दख्खनच्या शहेनशाहलाही बाजीराव यांचा काटा काढणे शक्य झाले नाही.

निजामांची खासगी जहागिरी लुटली- बाजीराव हे अटकेपार मराठा साम्राज्याचा विस्तार करत अटकेपार झेंडा फडकावत पुढे वाटचाल करत. दख्खनचा शहेनशाह मराठा दौलतीवर चाल करून आला असता पुणे,साताराचे दहन करत 10 हजार घोडेसवारांसह गोदावरी पार करून त्यांनी पारनेर,औरंगाबाद,डोंगरगाव,सिल्लोड ही गावे भस्मसात केली.निजाम ऐवज खान याने जालना येथे बाजीराव यांना गाठले. बुर्हाणपूरला सरदार त्रिंबक दाभाडे 11 हजार सैनिकांसह चाल करून आला असता बाजीराव यांनी कसोशिने लढा दिला.सुरतला निजामाच्या खासगी जहागिरीची केलेली लूट त्यांच्या अफाट पराक्रमाची साक्ष देते. आता तूला पालखेड दाखवतो,असे बाणेदार उत्तर दिले.त्यामुळेच घाबरलेला निजाम म्हणाला "खुदाने इसे पर बक्षे है,ये आदमी नही परिंदा है! बाजीराव हे त्यांच्या सारंगा,निळा,गंगा व अबलख या आवडत्या घोड्यावर स्वारी करत.

पालखेड येथील पराक्रम-येथील लढाई 28 फेब्रुवारी 1728 ला झाली. ज्यात श्रीमंत बाजीराव पहिले यांनी हैदराबादचा निजाम कमरूद्दीन खान व त्याच्या सैन्यास उत्कृष्ट युद्धतंत्र व गणिमी काव्याने नामोहरम केले. निजामाला खेळवत व कोंडी स्वतःला अनुकूल ठिकाणी आणत विजय मिळविला.निजामउद्दीनला चोहीकडून कोंडत त्यांनी अवघ्या 29 व्यावर्षी या बलाढ्य शत्रूची रसद रोखली .अन्नपाणी संपल्यावर शत्रूसैन्यास उंटाच्या मदारीतील पाणी प्यावे लागले होते. पालखेड येथील जोगिनी डोंगर याची साक्ष ठरतो.निष्प्रभ निजामी सैन्यास 1दिवस शिवना नदीचे पाणी व 500 गाड्या पाठवणारे दर्यादील बाजीराव शत्रूंनेही अनुभवल्यानंतर पुढे त्यांना शस्त्र उचलणेच जड गेले.

सदैव सावध दक्ष बाजीराव- बाजीराव पेशवे हे अतिशय रूबाबदार,देखणे पुरुष! त्यांच्या व्यक्तीमत्व गारूड केवळ रयतेतच नव्हे तर शत्रूंच्या दरबारीही असे.जुण्या ऐतिहासिक बखरीत तसा रंजक व रोमहर्षक उल्लेख आहे.तर इतिहासकार ना.स.इनामदार यांनी आपल्या "राऊ" या कादंबरीत याचे मार्मिक वर्णन केले आहे.

बाजीराव हे फारच देखणे आहेत,असे ऐंकून असल्याने एकदा निजामाच्या बेगमांनी या "सुरतपाक" लढवय्याला पाहण्याचा हट्ट धरला,चिडलेल्या त्या बादशहास तो नाकारणे जड गेले होते.

बाजीराव आणि मस्तानी- मस्तानी ही बुंदेलखंडच्या छत्रसाल राजाची रूपकन्या! या दोघांच्या अमरप्रेमकथेविना इतिहासाची पाने अपूर्ण ठरतात.दोघांचा विवाहही झाला.मस्तानी ही प्रणामी पंथाची,शाकाहारी,कृष्ण व गणेश भक्त. आचरणात तर शुद्ध ब्राह्मणांप्रमाणेच.

सारांश-दिल्लीतीला ताळ्यावर आणू शकेल असा तो एकच परमप्रतापी पुरुष भारतात होता. जगात दोन ब्राह्मण नावाजले गेले.एक परशूराम. ज्याने उन्मत्त क्षत्रियांना बुडविले तर दुसरे थोरले बाजीराव ज्यांनी तुर्क्यांचीही तिच स्थिती केली. दिल्लीचा वजीर मोहंमद खान बंगेश हा चाल करून आल्यावर छत्रसाल राजाने बाजीराव यांस "जो गति ग्राह गजेंद्रकी सो गति भई जानहू आज,बाजी जात बुंदेल की राखो लाज "असा गजन्तमोक्षाचा हवाला व तात्काळ 40 हजार सैनिकांसह खुद्द बाजीराव यांची मोहंमद खान बंगेशवरवर यशस्वी चाल! असे प्रसंग त्यांच्या पराक्रमाची गाथाच सांगतात,शिवाय याच पराक्रमाबद्दल छत्रसालने मस्तानीचा त्यांच्यासोबत विवाह लावला,ज्यांना समशेरबहाद्दर हा मुलगाही होता.अशा या महापराक्रमी विराचे पुण्यात 1740 ला निधन झाल्यानंतर व्याकुळ मस्तानीने विष प्राशन करून आपला देह ठेवून एक प्रकारे सती गेल्याचे स्पष्ट होते.

**द्वारा-सतीश पुरूषोत्तम अन्वेकर**
**म्युनिसिपल कॉलनी, 12,**
**पूजा, काळा दरवाजा,वंदेमातरम**
**सभागृहासमोर,छत्रपती संभाजीनगर**
**मोबाईल-7719058209**
**What's app-8855908209**

## परभणी तालुक्यातील सर्व धान्य लाभार्थ्यांनी ई-केवायसी व मोबाईल सीडींग प्रक्रीया तात्काळ पूर्ण करावी तहसीलदार डॉ. संदीप राजपुरे

**हिंदू प्रकाश वार्ता / प्रतिनिधी**

परभणी- सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी आणि खऱ्या व पात्र लाभार्थ्यांपर्यंत अन्नधान्याचा लाभ पोहोचवण्यासाठी अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या निर्देशानुसार राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत विशेष मोहीम राबवली जात आहे. मोहिमेअंतर्गत परभणी तालुक्यातील अंत्योदय अन्न योजना तसेच प्राधान्य कुटुंब योजनेतील (PHM) रेशनकार्डवर नौद असलेल्या प्रत्येक सदस्याची ई-केवायसी (e-KYC) पडताळणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

शासनाने दिलेल्या मुदतीत ई-केवायसी पूर्ण न केल्यास, रेशन तात्पुरत्या स्वरुपात बंद अथवा रेशन कार्ड फ्रिज होऊ शकते व त्यामुळे भविष्यात मिळणारे धान्य वितरण खंडित होण्याची शक्यता आहे. रेशन सुरळीत सुरु ठेवण्यासाठी खालील २ पद्धतींपैकी एका पद्धतीने ई-केवायसी प्रक्रिया तात्काळ पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन परभणीचे तहसीलदार डॉ. संदीप राजपुरे यांनी केले आहे

ई-केवायसी (e-KYC) करण्याच्या २ पद्धतीः

**१. ऑनलाईन पदधत (घरबसल्या मोबाईलवरून):** (टीपः यासाठी तुमचा आधार नंबर रेशन कार्डशी लिंक असणे आवश्यक आहे).

सर्वात आधी Google Play Store वरया Aadhaar FaceRD आणि Mera eKYC हे दोन ॲप्स इन्स्टॉल करा. Mera eKYC ॲप ओपन करा आणि तुमचे Residential State (सध्या राहण्याचे राज्य) व Home State (मूळ राज्य) निवडून Proceed करा. तुमचा आधार नंबर टाका आणि Generate OTP वर क्लिक करा. मोबाईलवर आलेला OTP व कॅप्चा टाकून Submit करा.

स्क्रीनवर माहिती दिसेल; तिथे Face eKYC पर्यायावर क्लिक करा. कॅमेरा ओपन झाल्यावर तुमचा चेहरा स्कॅन करा (स्कॅन करताना डोळ्यांची हालचाल करा). केवायसी यशस्वी झाल्यावर मेसेज येईल.

**२. ऑफलाईन पद्धत (रेशन दुकानात जाऊन मोफत):**

प्रक्रीया कुठे करावीः लाभार्थ्यांनी आपल्या जवळच्या संबंधित रास्त भाव धान्य दुकानात (रेशन दुकान) जावे.

सोबत आणायची कागदपत्रेः सोबत आधार कार्ड आणि रेशन कार्ड घेऊन जाणे आवश्यक आहे.

बायोमेट्रिक पडताळणीः रेशन दुकानदार ई-पास (e-Pos) मशीनद्वारे स्वतःच्या अंगठ्याचा किंवा बोटांचा ठसा देऊन आधार ई-केवायसी विनामूल्य पूर्ण करून देईल.

सर्व सदस्यांची उपस्थितीः रेशनकार्डवर नाव असलेल्या लहान-मोठ्या सर्व सदस्यांनी प्रत्यक्ष रेशन दुकानात जाणे गरजेचे आहे.

ई-केवायसी झाली की नाही (Status) कसे तपासावे?

Mera Ration ॲपमध्ये लॉगिन करून तुमची केवायसी आधीच पूर्ण (Approved) दाखवत असेल, तर तुम्हाला पुन्हा केवायसी करण्याची गरज नाही.

तपासण्याच्या स्टेप्सःवरील ऑनलाईन स्टेप्स फॉलो करा.

माहितीच्या शेवटी e-KYC Status समोर 'Y' लिहिलेले दिसल्यास तुमची केवायसी यशस्वी झाली आहे. (केवायसी मंजूर होण्यासाठी साधारण १.५ ते २ महिन्यांचा कालावधी लागू शकतो).

**इतर महत्वाच्या सूचना :**

**मोबाईल सिडींग (मोबाईल नंबर रेशन कार्डशी जोडणे):** शिधापत्रिकाधारकांता धान्याच्या वितरणाचे मेसेज (SMS), पावती आणि ऑनलाईन सेवांसाठी ओटीपी (OTP) वेळेवर मिळण्यासाठी रेशन कार्डला चालू मोबाईल क्रमांक लिंक (Seed) करणे अनिवार्य आहे. ज्या लाभार्थ्यांनी अद्याप आपला मोबाईल क्रमांक जोडलेला नाही किंवा ज्यांचा मोबाईल क्रमांक बदलला आहे, त्यांनी तात्काळ रेशन दुकानदाराकडे आऊन आपला नवीन मोबाईल नंबर अपडेट (सिडींग) करून घ्यावा,

आधार वायोमेट्रिक अपडेटः ज्या लाभार्थ्यांच्या हाताचे ठसे है-पास मशीनवर येत नाहीत किंवा ज्या लहान मुलांचे वय ५ व १५ वर्षे पूर्ण झाल्यामुळे आधार बायोमेट्रिक अपडेट झालेले नाही, त्यांनी तात्काळ जवळच्या आधार केंद्रावर जाऊन आपले बायोमेट्रिक अपडेट करून घ्यावे.

रास्त भाव दुकानदारांना निर्देशः परभणी तालुक्यातील सर्व रास्त भाव धान्य दुकानदारांनी आपल्या दुकानाशी संलग्न सर्व लाभार्थ्यांना ई-केवायसी आणि मोबाईल सिडींगबावत योग्य माहिती देऊन १००% काम तेळेत पूर्ण करून घ्यावे,

तरी परभणी तालुक्यातील सर्व शिधापत्रिकाधारकांनी कोणत्याही अफवांना बळी न पडता तात्काळ आपली ई-केवायसी व मोबाईल सिडींग पूर्ण करावी आणि शासकीय योजनेचा विनाअडथळा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

## जिममधील तरुणांना नशेची औषधे विकरणारे तिघे जेरबंद

**अहिल्यानगर** :शहरातील गांधी मैदान परिसरात जिममध्ये जाणाऱ्या तरुणांना नशा आणि ताकद वाढवण्यासाठी बेकायदेशीर औषधे विकणाऱ्या तिघांना कोतवाली पोलिसांनी रंगेहात पकडले. त्यांच्याकडून 35 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.महिला पोलीस हवालदार रोहिणी अशोक दरंदले यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात याप्रकरणी फिर्याद नोंदवली आहे. पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख व पथक शहरात गस्त घालत होते. त्यावेळी गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, मार्कंडेय शाळेसमोर काही तरुण डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय नशेची औषधे विकण्यासाठी थांबले आहेत. पोलिसांनी तातडीने दोन पंचांना सोबत घेऊन औषध निरीक्षक सोमनाथ मुळे यांच्या उपस्थितीत सदर ठिकाणी दुपारी छापा टाकला

या कारवाईत प्रताप अशोक अकोलकर (वय 21, रा. करंजी, ता. पाथर्डी), तेजस गंगाधर वारुळे (वय 21, रा. तपोवन रस्ता, अहिल्यानगर) आणि तेजस अमित उळागड्डे (वय 22, रा. गजानन कॉलनी, अहिल्यानगर) या तिघांना ताब्यात घेण्यात आले. पंचांसमक्ष घेतलेल्या झडतीत त्यांच्या काळ्या पिशवीत कमी रक्तदाबावर वापरल्या जाणाऱ्या मेफेंटरमाइन सल्फेटच्या 40 बाटल्या आणि एक मोटारसायकल असा एकूण 35 हजार रुपयांचा माल सापडला.चौकशी दरम्यान आरोपींनी कोणतीही परवानगी नसताना ही औषधे ऑनलाईन मागवून नशा करण्यासाठी विक्री करत असल्याची कबुली दिली. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय हे औषध घेतल्यास भ्रम होणे, चक्कर येणे आणि जीवाला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. अन्न व औषध प्रशासनाने यातील नमुने तपासणीसाठी ताब्यात घेतले असून, तिन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## धन दांडग्यांचे पक्के अतिक्रमण काढण्यास नगरपरिषद प्रशासन धजावत नसल्याचा आरोप

**राहुरी** :राहुरी नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने दि. २ सप्टेंबर रोजी राहुरी शहरात अतिक्रमण काढण्यास सुरुवात केली. मात्र शहरातील ध&न दांडग्यांचे पक्के अतिक्रमण काढण्यास नगरपरिषद प्रशासन धजावत नसल्याचा आरोप सर्व सामान्य जनतेमधून होत आहे.

राहुरी शहरातील प्रत्येक रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झालेले आहे. छोट्या मोठ्या टपऱ्या सह मोठ्या पक्क्या इमारती अतिक्रमणात आहेत. त्यामुळे रहदारीस नेहमीच अडथळे निर्माण होत असतात. वाहतूकीची नेहमीच कोंडी होत असते. राहुरी नगरपरिषदच्या मुख्याधिकारी विद्या पाटील यांनी दि. २ सप्टेंबर २०२६ रोजी पोलिस बंदोबस्त घेऊन राहुरी शहरातील अतिक्रमण काढण्यास सुरुवात केली. शहरातील नवीपेठ, आडवी पेठ, भागीरथीबाई शाळा रोडला असलेल्या छोट्या टपऱ्या काढण्यात आल्या. त्यामुळे रस्ता मोकळा झाला आहे.

या प्रसंगी वंचितचे पिंटूनाना साळवे यांनी नगरपरिषदच्या कारभारा बाबत संताप व्यक्त केला. ते म्हणाले कि, शहरातील नवीपेठ, आडवी पेठ, शनी चौक, शिवाजी चौक, जुनी पेठ आदि भागात मोठ मोठ्या इमारती अतिक्रमणात आहेत. शहरातील पक्के अतिक्रमण काढण्यास नगरपरिषद प्रशासन धजावत नाही. प्रत्येक वेळी गोर गरीबांनाच त्रास दिला जातो. अगोदर धन दांडग्यांचे पक्के अतिक्रमण काढा नंतर गोर गरीबांचे अतिक्रमण काढा. धन दांडग्यांचे अतिक्रमण तसेच ठेवून फक्त गोर गरीबांचे अतिक्रमण काढले तर मी कोणत्याही वेळी नगरपरिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु करेल, असा इशारा पिंटूनाना साळवे यांनी दिला.

## गुलाबी बोंडअळीच्या शाश्वत व्यवस्थापनासाठी शास्त्रीय प्रतिकारशक्ती व्यवस्थापनाचा अवलंब आवश्यक

### वनामकृवित संशोधन संचालनालय व क्रॉपलाइफ इंडियाच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

**हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी**



वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीच्या संशोधन संचालनालय आणि क्रॉपलाइफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने 'कापूस पिकामध्ये गुलाबी बोंडअळीच्या शाश्वत व्यवस्थापनासाठी सहयोगात्मक प्रतिकारशक्ती व्यवस्थापन (RM)' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन दिनांक २ सप्टेंबर २०२६ रोजी विद्यापीठाच्या सिम्पोजियम हॉलमध्ये करण्यात आले. कार्यशाळेस मराठवाड्यातील कापूस उत्पादक प्रगतिशील शेतकरी, कृषि संशोधक तसेच कृषि विभागातील अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा उद्घाटक विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणी यांनी आभासी माध्यमाद्वारे भाषणात सांगितले की, कापूस हे मराठवाड्यातील प्रमुख नगदी पीक असून, गुलाबी बोंडअळीसारख्या गंभीर संकटावर मात करण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन, योग्य वेळी कीड व्यवस्थापन आणि प्रतिकारशक्ती व्यवस्थापनाच्या तत्त्वांचा अवलंब करणे अत्यंत आवश्यक आहे.

संशोधन संचालक डॉ. भगवान असेवार यांनी कापूस पिकावरील किडींमध्ये कीटकनाशकांविरुद्ध निर्माण होणारी प्रतिकारशक्ती रोखण्यासाठी सर्व संबंधित घटकांनी समन्वयाने प्रयत्न करण्याची आवश्यकता अधोरेखित केली. तसेच शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून कापूस उत्पादन खर्चात बचत करावी तसेच शाश्वत शेती पद्धतींचा स्वीकार करावा, असे आवाहन केले. कार्यक्रमास शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे आणि विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे, संशोधन उपसंचालक डॉ. रणजीत चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. कीटकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. पुरुषोत्तम नेहरकर यांनी प्रास्ताविकातून कापूस पिकातील कीड व्यवस्थापनाची सद्यस्थिती तसेच या संदर्भातील विद्यापीठाच्या संशोधनाची भूमिका स्पष्ट केली. परभणी येथील कृषि विभागाचे कृषी उपसंचालक श्री स्वप्निल जाधवर यांनी शासकीय योजना आणि त्यांची शेतकरी स्तरावर प्रभावी अंमलबजावणी याविषयी विशेष मनोगत व्यक्त केले.

क्रॉपलाइफ इंडियाचे स्टीवर्डशिप मॅनेजर डॉ. सुरेंद्र कुमार यांनी उपस्थितांचे स्वागत करून कार्यशाळेच्या उद्देशावर प्रकाश टाकला. उद्घाटन सत्राचे आभार प्रदर्शन ज्वार कीटकशास्त्रज्ञ डॉ. नरेशकुमार जायेवार यांनी केले.

तांत्रिक सत्रामध्ये विविध तज्ज्ञांनी गुलाबी बोंडअळीच्या शाश्वत व्यवस्थापनासंदर्भात शेतकऱ्यांना सविस्तर तांत्रिक मार्गदर्शन केले. ज्वार कीटकशास्त्रज्ञ डॉ. नरेशकुमार जायेवार यांनी कापूस पिकातील गुलाबी बोंडअळीची सद्यस्थिती, बदलत्या हवामानामुळे निर्माण होणारी आव्हाने तसेच भविष्यातील संभाव्य परिस्थितीचे सविस्तर विश्लेषण केले. कापूस कीटकशास्त्रज्ञ डॉ. बस्वराज भेदे यांनी गुलाबी बोंडअळीच्या विविध अवस्थांची ओळख, कामगंध सापळ्यांचा (फेरोमोन ट्रॅप्स) वापर, जैविक नियंत्रण उपाययोजना तसेच रासायनिक कीड व्यवस्थापनाचे योग्य नियोजन याविषयी मार्गदर्शन केले.

कीटकशास्त्र विभागाचे कीटकशास्त्रज्ञ डॉ. अनंत लाड आणि डॉ. दिगंबर पटाईत यांनी एकात्मिक प्रतिकारशक्ती व्यवस्थापनाच्या (IRM) मूलभूत तत्त्वांची माहिती दिली. कीटकांमध्ये कीटकनाशकांविरुद्ध प्रतिकारशक्ती निर्माण होऊ नये, यासाठी विविध व्यवस्थापन पद्धतींचा एकात्मिक अवलंब करण्याचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. क्रॉपलाइफ इंडियाचे को-लीड, आयआरएसी (IRAC) तथा कोर्टेवा ॲग्रीसायन्सेसचे स्टीवर्डशिप लीड डॉ. बसवेश्वर घोडकी यांनी प्रभावी प्रतिकारशक्ती व्यवस्थापन धोरणे, कीटकनाशकांच्या कार्यपद्धतीमध्ये (MoA) योग्य फेरबदल करण्याची आवश्यकता तसेच उत्तम कृषि पद्धतींच्या (GAP) अवलंबाबाबत सविस्तर सादरीकरण केले.

## कर्नाटकातून सात आरोपी ताब्यात जेसीबी चोरीचे तीन गुन्हे उघडकिस

**हिंदू प्रकाश वार्ता**

जिंतूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जेसीबी ब्रेकर यांची झालेल्या चोरीच्या गुन्ह्याचा तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे मोठ्या बारकाईने तपास करत स्थानिक गुन्हा शाखेने मोठी कारवाई केली आहे जेसीबी चोरीचे धागेदोरे कर्नाटकातील विजयपूर येथील सात आरोपींना ताब्यात घेण्यात आले या चौकशीत जिंतूर सह बीड जिल्ह्यातील व संभाजीनगर जिल्ह्यातील जेसीबी ब्रेकर चोरीचे एकूण तीन प्रकरणे उघडकिस आले आहे पोलिसांनी आरोपीकडून तब्बल 84 लाख 15 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून जिंतूर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्याचा तपास करत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या विशेष पथकाने संशयिताच्या हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून तसेच गोपनीय बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे तपासाची चक्री फिरवून कर्नाटकाच्या विजयपूर गावातील आरोपीचा माग काढून चोरी केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर पोलीस पथकाने सात आरोपींना ताब्यात घेतली असून आरोपीच्या चौकशीत जिंतूर वडवणी आणि बिडकीन( छत्रपती संभाजीनगर) पोलीस ठाण्याच्या हद्दीत ब्रेकर चोरीचे तीन गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले असून पोलिसांनी आरोपीकडून चार जेसीबी ब्रेकर एक जेसीबी डस्टर कार मोटरसायकल आणि सहा मोबाईल फोन असा एकूण 84 लाख 15 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून या कारवाई या कारवाईत जगन्नाथ किशन काळे वय 47 वर्षे दत्तात्रय नारायण जाधव वय 35 वर्ष नामदेव भगवान जाधव वय 55 वर्ष सोमेश्वर मनोहर शेंबाडे वय 38 वर्ष किशोर लहू खंडागळे वय 30 वर्षे रामेश्वर दिलीप पांगरे वय 27 वर्ष आणि अमोल अंकुश पवार वय 28 वर्षे या सात आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे हे सर्व आरोपी बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील परिसरातील रहिवासी असून या सर्व आरोपींना पुढील तपासासाठी जिंतूर पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे

ही कारवाई पोलीस अधीक्षक पंकज कुमार कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुना शाखेचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या केलेल्या सूक्ष्म निरीक्षणाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश सवंडकर पोलीस उपनिरीक्षक मधुकर चट्टे स.पोलीस उपनिरीक्षक सुनील केंद्रे साहेब पोलीस उपनिरीक्षक निलेश भुजबळ विलास सातपुते पांडुरंग तूपसुंदर पोलीस शिपाई उमेश चव्हाण यांच्या विशेष पथकाने ही कारवाई केली सहायक पोलीस उपनिरीक्षक विशेष तांत्रिक सहकार्य केले या सर्व कार्यवाहीमध्ये पोलीस हवालदार उत्तम मानवते यांनी चालक म्हणून उत्तम रित्या चोख कामगिरी बजावली.

# 'क्रॉसरोडस् - 4' अंतर्गत उद्या विशेष संवाद कार्यक्रम

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा इन्स्टिट्यूट ऑफ सोशियो- इकॉनॉमिक रिसर्च अँड नॅशनल इंटिग्रेशन छत्रपती संभाजी नगर आणि मराठवाडा जनता विकास परिषद शहर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने उद्याचे औद्योगिकरण - नागरी सुविधांची गरज व पूर्तता ('क्रॉसरोडस् - ४ विचार आणि सुधारणा' या विकासात्मक मालिकेअंतर्गत) विशेष संवाद कार्यक्रम आयोजिण्यात आला आहे. शनिवारी, ५ सप्टेंबर रोजी सकाळी ११.१५ वा. नागेश्वर वाडीतील स्वातंत्र्य सैनिक कॉलनीतील एस.आर. टी. संस्थेच्या सभागृहात ऑरिक-शेन्द्रा/बिडकीनचे प्रकल्प व्यवस्थापक अरुण डुबे आणि महापौर समीर राजूरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संभाषण आणि चर्चात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. एसआरटी संस्थेचे प्रवक्ते डॉ. शिरिष खेडगीकर यांनी ही माहिती दिली. नागरिकांनी कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन संस्थेच्या वतीने डॉ. खेडगीकर यांनी केले आहे.

# श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त उद्या रंगणार 'श्यामरंग' कार्यक्रम

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

स्वरलहरी प्रतिष्ठान आणि गीतांजली संगीत विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच ट्रान्सडेल्टा फाउंडेशनच्या सहकार्याने श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्त 'श्यामरंग' या संगीत मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, ५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता मृदगंध कलादालन येथे कार्यक्रम होणार आहे. यात आरती अय्यंगार, सारिका कुलकर्णी आणि मिलिंद डोलारे यांचे गायन असून,

दीपाली कुलकर्णी ह्या निवेदन आणि कविता वाचन करणार आहेत. गायक मंडळीला जितेंद्र साळवी, राहुल जोशी, मिलिंद डोलारे साथसंगत करणार असून, प्रकाश खुरासे हे ध्वनी व्यवस्था सांभाळणार आहेत. या कार्यक्रमासाठी प्रशांत नानकर आणि प्रकाश खुरासे यांनी आयोजनात सहकार्य केले आहे. श्रीकृष्णाच्या विविध छटा दर्शविणारी सुमधूर हिंदी, मराठी गाणी आणि भावपूर्ण कवितांच्या मैफलीचा आनंद घेण्यासाठी रसिक प्रेक्षकांनी आवर्जून उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

# आहारात पौष्टिक तृणधान्यांचे महत्त्व अनन्यसाधारण : डॉ. सूर्यकांत पवार

## राष्ट्रीय पोषण सप्ताह उत्साहात प्रारंभ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** येथील राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्प व लिहाखेडी (पालोद) येथील शासकीय कृषी महाविद्यालयात १ ते ७ सप्टेंबर या कालावधीत राष्ट्रीय पोषण सप्ताह साजरा करण्यात येत आहे. यावेळी 'दैनंदिन आहारात पौष्टिक तृणधान्यांचे महत्त्व' या विषयावर सहयोगी संशोधन संचालक डॉ. सूर्यकांत पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

डॉ. पवार म्हणाले, सध्याच्या धावपळीच्या जीवनात जंकफूडमुळे लठ्ठपणा, मधुमेह व रक्तदाब यासारखे विकार वाढत आहेत. यावर सर्वात प्रभावी उपाय म्हणजे आपल्या रोजच्या आहारात ज्वारी, बाजरी, नाचणी, वरई, राळा यांसारख्या पौष्टिक तृणधान्यांचा समावेश करणे आवश्यक आहे. तृणधान्य हे केवळ अन्न नसून, ते एक औषध आहे. यात प्रथिने, लोह, कॅल्शियम व तंतुमय पदार्थ भरपूर प्रमाणात असतात. ही पिके हलक्या जमिनीत, कमी पाण्यात येणारी असून, यांना खतही कमी लागते. हवामान बदलावर अनुकूल अशी ही पिके आहेत. या पिकांच्या पीकपद्धतीत समावेश कसा करता येईल, याविषयी माहिती देवून या पिकांचे फायदे पटवून देण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज असल्याचे डॉ. पवार म्हणाले.

या कार्यक्रमात डॉ. सी. बी. पाटील आणि डॉ. सुरेखा कदम यांनी प्रक्षेत्रावर घेण्यात आलेल्या बाजरी व इतर भरडधान्य पिकांच्या कृषीविषयक प्रयोगांची माहिती दिली. डॉ. पाटील यांनी बाजरीतील सुधारित वाण, पेरणी पद्धत व खत व्यवस्थापनाबद्दल, तर डॉ. सुरेखा कदम यांनी नाचणी, ज्वारी व इतर तृणधान्यांवरील संशोधन व त्यांचे पौष्टिक महत्त्व यावर सविस्तर माहिती दिली. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतअच्या आहारात तृणधान्याचा वापर करावा व शेतकऱ्यांमध्ये त्याचा प्रभावी प्रचार आणि प्रसार करण्याचे आवाहन यावेळी तज्ज्ञांनी केले. या कार्यक्रमास विद्यार्थी व महाविद्यालयातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रोस्टेट कॅन्सरविषयी वेळीच तपासणी आणि उपचार अत्यावश्यक

**छत्रपती संभाजीनगर :** पुरुषांमध्ये आढळणाऱ्या कर्करोगांमध्ये प्रोस्टेट कॅन्सरचे प्रमाण वाढत असून, या आजाराचे वेळीच निदान झाल्यास प्रभावी उपचार करणे शक्य आहे. त्यामुळे पुरुषांनी प्रोस्टेट कॅन्सरची लक्षणे, जोखमीचे घटक आणि नियमित तपासणी याबाबत जागरूक राहणे गरजेचे आहे, असे मत मेडिकव्हर हॉस्पिटलचे युरोलॉजिस्ट डॉ. मयूर दळवी आणि कर्करोग तज्ञ डॉ. अनुप तोष्णीवाल यांनी व्यक्त केले.डॉ. मयूर दळवी यांनी सांगितले की, "प्रोस्टेट कॅन्सरच्या सुरुवातीच्या टप्प्यात अनेक रुग्णांमध्ये ठळक लक्षणे दिसत नाहीत. त्यामुळे जोखीम असलेल्या पुरुषांनी डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य वेळी तपासणी करणे महत्त्वाचे आहे. लवकर निदान झाल्यास उपचारांचे पर्याय अधिक प्रभावी आणि परिणामकारक ठरू शकतात." डॉ. अनुप तोष्णीवाल यांनी सांगितले की, "प्रोस्टेट कॅन्सरबाबत पुरुषांमध्ये अजूनही संकोच आणि गैरसमज आढळतात. लघवीशी संबंधित कोणतीही समस्या दीर्घकाळ दुर्लक्षित न करता तज्ज्ञांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. जनजागृती, नियमित तपासणी आणि वेळेवर उपचार हे प्रोस्टेट कॅन्सरविरुद्धच्या लढ्यात महत्त्वाचे घटक आहेत."

# येलदरी पुलावर पुन्हा अपघात; ४६ प्रवाशांचे प्राण थोडक्यात बचावले

## प्रशासकीय अनास्थेमुळे जीवघेण्या पुलाचा प्रश्न ऐरणीवर; नवीन पुलासाठी नागरिकांचा आक्रोश

जिंतूर/प्रतिनिधी : सचिन रायपत्रीवार

विदर्भ आणि मराठवाड्याला जोडणाऱ्या येलदरी धरणावरील अरुंद व जीर्ण पुलावर मंगळवारी पुन्हा एकदा मोठा अपघात घडला. रिसोड ते पंढरपूर जाणारी एसटी बस (क्रमांक MH-14-MH-2367) पुलावरून जात असताना पाठीमागून भरधाव वेगाने आलेल्या ट्रकने (क्रमांक MH-17-BY-0642) जोरदार धडक दिली. बसचालकाच्या प्रसंगावधानामुळे मोठी जीवितहानी टळली असली, तरी बसमधील ४६ प्रवाशांचे प्राण काही काळासाठी टांगणीला लागले होते.



सात दशकांपूर्वी उभारण्यात आलेला येलदरी धरणावरील हा पूल सध्या अत्यंत जीर्ण अवस्थेत असून एका वेळी केवळ एकच वाहन जाऊ शकेल इतका अरुंद आहे. परिणामी या मार्गावर वारंवार अपघात घडत असून प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. अनेक वर्षांपासून या पुलाच्या दुरुस्ती अथवा पर्यायी पुलाच्या उभारणीची मागणी होत असतानाही प्रशासन आणि लोकप्रतिनिधींकडून ठोस पावले उचलली जात नसल्याची नागरिकांची तक्रार आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या पुलावर आजवर शेकडो लहान-मोठे अपघात झाले असून अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. तरीही प्रशासनाकडून केवळ आश्वासनांची खैरात सुरू असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. मंगळवारी घडलेल्या घटनेनंतर पुन्हा एकदा पुलाच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

दरम्यान, नागरिकांनी हा धोकादायक पूल तात्काळ वाहतुकीसाठी बंद करण्याची मागणी केली आहे. तसेच विदर्भ आणि मराठवाड्याला जोडणाऱ्या या महत्त्वाच्या मार्गावर अत्याधुनिक व रुंद नवीन पूल उभारण्यात यावा, अशी मागणीही जोर धरत आहे. नवीन पुलाचे काम पूर्ण होईपर्यंत या मार्गावर कठोर वाहतूक नियमन लागू करून अपघात रोखावेत, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

येलदरी पुलावरील वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने आता तरी जागे होऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा सर्वसामान्य प्रवासी आणि नागरिक व्यक्त करीत आहेत.

# सिडकोकालीन सफाई कामगारांच्या मागण्यांबाबत स्थायी समिती सभापतींना निवेदन

## प्रलंबित वेतन, सेवेत कायमस्वरूपी सामावून घेण्यासह विविध मागण्यांवर सकारात्मक विचार करण्याचे अनिल मकरिये यांचे आश्वासन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** सिडकोकालीन सफाई कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात सिडकोकालीन सफाई कामगार कर्मचारी कृती समितीच्या वतीने महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांना निवेदन सादर करण्यात आले. सफाई कामगारांच्या सेवा, वेतन तसेच प्रलंबित आर्थिक बाबींशी संबंधित विविध प्रश्न तत्काळ मार्गी लावण्याची मागणी यावेळी करण्यात आली.




कृती समितीने सादर केलेल्या निवेदनात सिडकोकालीन सफाई कामगारांनी दीर्घकाळ केलेल्या सेवांचा विचार करून त्यांना बिनाअट व विनाशर्त महानगरपालिका सेवेत सामावून घेण्यात यावे, तसेच समान कामासाठी समान वेतन लागू करावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.

सफाई कामगारांचे वेतन नियमानुसार नियमितपणे अदा करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, प्रलंबित वेतन फरकाची रक्कम तत्काळ देण्यात यावी, तसेच महाराष्ट्र शासनाच्या किमान वेतन अधिनियमानुसार महागाई भत्त्यात झालेल्या वाढीच्या अनुषंगाने १ जून २०२६ ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीसाठी वेतनवाढ लागू करावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली.

याशिवाय सिडको-हडको विभागांतर्गत पूर्वीपासून कार्यरत असलेल्या सिडकोकालीन सफाई कामगारांना त्यांच्या पात्रतेनुसार सफाई कामगार म्हणून विनाअट सेवेत सामावून घ्यावे, तसेच सफाई कामगारांच्या वेतनातून बचत गटाच्या माध्यमातून कपात करण्यात आलेल्या रकमेबाबत आवश्यक कार्यवाही करून संबंधित रक्कम कामगारांना अदा करावी, अशी मागणी करण्यात आली.

स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी कृती समितीच्या सर्व मागण्या सहानुभूतीपूर्वक ऐकून घेतल्या. संबंधित मागण्यांबाबत प्रशासनाकडून आवश्यक माहिती व नोंदी तपासून नियमानुसार सकारात्मक विचार करून योग्य ती कार्यवाही करण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

# लघु उद्योजकांसाठी सुवर्णसंधी; उत्कृष्ट लघुउद्योग जिल्हा पुरस्कारांसाठी 30 ऑक्टोबरपर्यंत अर्ज मागविले

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राज्य शासनातर्फे उत्कृष्ट लघुउद्योग घटकांची निवड करून त्यांना जिल्हा पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. सन २०२६ या वर्षासाठी 'उत्कृष्ट लघुउद्योग जिल्हा पुरस्कार योजने'अंतर्गत पात्र लघुउद्योजकांकडून ३० ऑक्टोबरपर्यंत अर्ज मागविण्यात आले आहेत, अशी माहिती जिल्हा उद्योग केंद्राच्या उप आयुक्त करुणा खरात यांनी दिली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग आयुक्तालयांतर्गत जिल्हा उद्योग केंद्रामार्फत ही पुरस्कार योजना राबविली जाते. सन २०२६ च्या पुरस्कारासाठी १ जानेवारी २०२६ पूर्वी स्थायी लघुउद्योग नोंदणी अथवा 'उद्यम नोंदणी' झालेला आणि मागील दोन वर्षांपासून सलग उत्पादनात असलेला लघुउद्योग घटक या पुरस्कारासाठी पात्र ठरणार आहे. तसेच, संबंधित उद्योग घटक कोणत्याही वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा, असा निकष ठेवण्यात आला आहे. या स्पर्धात्मक पुरस्कारांतर्गत प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास शाल, श्रीफळ व १५ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. तर द्वितीय क्रमांकाच्या विजेत्यास शाल, श्रीफळ व १० हजार रुपयांचे रोख पारितोषिक देऊन सन्मानित केले जाईल.

इच्छुक उद्योजकांनी फोटोसह विहित नमुन्यातील अर्ज, उद्यम नोंदणी प्रमाणपत्र, मागील पाच वर्षांतील गुंतवणूक, रोजगार, उत्पादन व वर्षनिहाय नफ्याची माहिती, मागील तीन वर्षांचे ताळेबंद व नफा-तोटा पत्रक, तसेच कर्ज खाते नियमित असल्याबाबत संबंधित बँकेचे पत्र यांसारख्या आवश्यक कागदपत्रांसह आपले प्रस्ताव सादर करणे गरजेचे आहे.

अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ३० ऑक्टोबर असून, या मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा कोणताही विचार केला जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. या पुरस्काराबाबत अधिक माहिती आणि अर्जाचा नमुना हवा असल्यास उद्योजकांनी जिल्हा उद्योग केंद्र, माहिती तंत्रज्ञान इमारत, दुसरा मजला, गरवारे स्टेडियमजवळ, छत्रपती संभाजीनगर येथे प्रत्यक्ष संपर्क साधावा, असे आवाहन उप आयुक्त करुणा खरात यांनी केले आहे.

# घोटा देवी ग्रामपंचायतीतील पाणीपुरवठा योजनेचे काम तातडीने सुरू करण्याची मागणी

## मदन शेळके यांनी दिला जलजीवन मिशनच्या रखडलेल्या कामाविरोधात आत्मदहनाचा इशारा

हिंगोली/गोपाल सातपुते

हिंगोली | घोटा देवी ग्रामपंचायत येथील जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा नळ योजनेचे काम रखडल्याने नागरिकांना पाणीपुरवठ्यापासून वंचित राहावे लागत असल्याचा आरोप करत दैनिक हिंगोली लोकप्रशासनचे मुख्य संपादक मदन आनंद राव शेलके यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर केले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, घोटा देवी येथील ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागांतर्गत जल जीवन मिशनच्या कामासाठी गावात कोट्यवधी रुपयांची कामे झाली असल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात गावातील नागरिकांना पाणीपुरवठा होत नाही. संबंधित कंत्राटदाराला प्रशासनाकडून केवळ कागदोपत्री नोटिसा देऊन वेळ मारून नेली जात असून, त्याच्याकडून समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणात प्रशासनाने ठोस कार्यवाही न केल्याने कार्यकारी अभियंता नरवाडे, शिंदे, जाधव तसेच संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. तसेच मागण्यांवर तातडीने कार्यवाही न झाल्यास दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हा परिषद कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. या घटनेची सर्व जबाबदारी जिल्हा प्रशासनावर राहील, असा उल्लेखही निवेदनात करण्यात आला आहे.

निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता आणि हिंगोली शहर पोलीस निरीक्षक यांना देण्यात आल्या आहेत. घोटा देवी ग्रामपंचायतीतील पाणीपुरवठा योजनेचे काम तातडीने सुरू करून नागरिकांना नियमित पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# सोयगाव येथे वैद्यकीय अधिक्षक डॉ.दिनाजी खंदारे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन



हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.३ सप्टेंबर

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कमलाकर मुदखेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा दि.२५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर निमीत्त जिल्हा नेत्रशल्यचिकित्सक डॉ.अर्चना भडीकर यांच्या मार्गदर्शनानुसार दि.१ मंगळवार रोजी नेत्रदान पंधरवडया निमित्त ग्रामीण रुग्णालय सोयगाव येथे वैदयकीय अधिक्षक डॉ.दिनाजी खंदारे यांच्या मार्गदर्शनाखाली व वैद्यकीय अधिकारी डॉ.अजीत पाटिल यांच्या मार्गदर्शक उपस्थितीत नेत्रदान पंधरवाडा साजरा करण्यात आला.याप्रसंगी वैद्यकीय अधिकारी डॉ.अजित पाटिल यांनी नेत्रदानाविषयी माहिती देत नेत्रदानासाठी आवाहन करत त्यांच्या हस्ते नागरिकांना नेत्रदानसंमतीपत्राचे वाटप केले. यावेळी नेत्रचिकित्सा अधिकारी सुहासिनी जावळे यांनी उपस्थीत रुग्ण व नातेवाइकांचे नेत्रदानासंबंधी समज गैरसमज,नेत्रदानाची प्रक्रिया व त्यासंबंधित शंकाचे निरसन करत नेत्रदानसंमतीपत्र भरण्यासाठी आवाहन करत उपस्थितांकडून नेत्रदान संमतीपत्र भरुन घेत नेत्ररुग्णांची तपासणी केली,तसेच वैद्यकीय अधिकारी डॉ.चव्हाण व सुनिल वानखेडे यांनीही उपस्थितांना आवाहन करत नेत्रदानसंमतीपत्राचे वाटप केले यावेळी कारके,ज्योती आचरे,पंकज मंडवे,भुषण चव्हाण,गणेश बोटकर,ज्योती भवर व रुग्णांलयातील इतर कर्मचारी यांनी विशेष सहकार्य करत कार्यक्रम यशस्वी केला.

# रक्षाबंधनानिमित्त माई वृद्धाश्रमातील 25 माईंना साड्यांची भेट



**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी :** रक्षाबंधनाचा सण बहीण-भावाच्या प्रेमासोबतच सामाजिक बांधिलकी जपण्याची प्रेरणा देतो. याच भावनेतून समाजसेविका मीराबाई मिसाळ यांच्या वतीने माई वृद्धाश्रमातील २५ माईंना रक्षाबंधनानिमित्त साड्यांची भेट देण्यात आली. मीराबाई मिसाळ, जया मिसाळ, शीतल मिसाळ व दीपाळी मिसाळ या मिसाळ परिवाराने वृद्धाश्रमातील अनाथ निराधार माईंना साड्या देऊन रक्षाबंधनाचा सण आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा केला. या उपक्रमातून वृद्धाश्रमातील माईंप्रती असलेला जिव्हाळा, आपुलकी आणि सामाजिक संवेदनशीलता व्यक्त झाली.

यावेळी साड्यांचे वाटप करण्यात आल्याने वृद्धाश्रमातील महिलांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य उमटले. सणासुदीच्या काळात मिळालेल्या या प्रेमळ भेटीमुळे माईंना आपलेपणाची ऊब अनुभवायला मिळाली.

यावेळी माई वृद्धाश्रमाच्या संचालिका मीरा वाघमारे व ऋत्विक वाघमारे यांनी मिसाळ परिवाराचे आभार मानले. समाजातील अनाथ निराधार गरजू महिलांना मदतीचा हात देत सामाजिक बांधिलकी जपावी असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# प्रत्येकाने वर्षातून एकदा का होईना घरी पारायण करा असे आव्हान ज्ञानेश्वरी पारायण प्रचारक नितीन जाधव गोगलगावकर

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी :**-वीर वारकरी सेवा संघ परभणी च्या वतीने आव्हान करण्यात येत आहे की येणाऱ्या चार ऑगस्ट रोजी श्रावण महिन्यात श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या दिवशी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज जयंती महोत्सव च्या निमित्ताने प्रत्येकाने घरोघरी श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण केले पाहिजे श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी वाचन केले पाहिजे संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज जयंती व संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज समाधी सोहळा उत्सव आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी जयंती या महोत्सवाच्या अनुषंगाने वर्षातून एकदा का होईना प्रत्येकाने आपापल्या घरोघरी ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पारायण केले पाहिजे किंवा जिथे कुठे ज्ञानेश्वरी पारायण असेल अशा ठिकाणी जाऊन ज्ञानेश्वरी पारायण केले वाचन केले पाहिजे हीच खरी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज जयंती साजरी होय म्हणून एक ध्यास संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज जयंती निमित्त वर्षातून एकदा का होईना पारायण करण्याची संकल्पना प्रत्येकाने करा अशी आव्हान वीर वारकरी सेवा संघ परभणी प्रदेशाध्यक्ष तथा ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण प्रचारक नितीन जाधव गोगलगावकर यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून ज्ञानेश्वरी भक्तांना भाविक सामाजिक सेवकांना आव्हान केले आहे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज की जय ज्ञानराज माऊली ग्रंथराज ज्ञानेश्वरी भगवान की जय अशी माहिती ज्ञानेश्वरी पारायण प्रचारक नितीन जाधव गोगलगावकर त्यांनी पत्रकारद्वारे माहिती दिली .

# वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. व्हि.एस.इंदुलकर सर सेवानिवृत्त

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण / रायगड :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. व्ही. एस. इंदुलकर सर ३५ वर्षाच्या सेवा कालानंतर निवृत्त झाले. त्यातील १९९१ ते १९९३ पर्यंत जे एस एम कॉलेज अलिबाग येथे सुरुवातीची अडीच वर्ष वाणिज्य व्याख्याता म्हणून म्हणून सेवा केली. त्यांचे शिक्षण जे.एस. एम.कॉलेज अलिबाग येथे झाले. त्यानंतर म्हणजे डिसेंबर १९९३ ते ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत गेली ३३ वर्ष उरण महाविद्यालयात वाणिज्य विभाग प्रमुख सेवा पूर्ण केली.

याप्रसंगी शुभदा इंदुलकर, श्रीमती मीराताई पाटील, कवी राजेंद्र नाईक इत्यादी अनेक नातेवाईक व मित्र महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. पराग कारुळकर यांनी व्यक्त केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.दत्ता हिंगमिरे यांनी केले. सेवानिवृत्ती कार्यक्रम सोहळा सिल्वर ओक रिसॉर्ट नागाव उरण येथे मोठ्या उत्साहात व उत्तम प्रतिसादात संपन्न झाला.




कार्यक्रमाचे अध्यक्ष कोकण ज्ञानपीठ संस्थेचे सीईओ प्रदीपचंद्र शिंगारपुरे हे होते. तर प्रमुख अतिथी पाहुणे म्हणून मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व निरंतर शिक्षण विभागाचे डायरेक्टर प्रा. डॉ.बळीराम गायकवाड उपस्थित होते.

प्रा.व्हि.एस. इंदुलकर हे अत्यंत कर्तव्यनिष्ठ प्राध्यापक असून त्यांनी हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवले असे सांगितले. गेली २५ वर्ष डी एल एल ई या विभागात योगदान दिले. सेवानिवृत्तीच्या कार्यक्रमासाठी अतिथी म्हणून चेंबूर सर्वांकष शिक्षण संस्था बीएड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर चक्रधर हे उपस्थित होते. तर प्राचार्य चक्रदेव यांनी डी एल एल ई आणि वाणिज्य विभागातील त्यांचे विद्यापीठ पातळीवरचे कार्य ठसा उमटवणारे असल्याचे सांगितले. उरण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मिक गर्जे यांनीही यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना शिस्त आणि नियोजन त्यांच्याकडून शिकण्यासारखे असल्याचे प्रतिपादन केले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रदीपचंद्र शृंगारपुरे यांनी कोकण ज्ञानपीठ संस्थेच्या विकासात त्यांनी दिलेली योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगितले. डॉ. ए.आर. चव्हाण यांनी प्रा.इंदुलकर यांचा जीवन परिचय सांगितला.

याप्रसंगी रमेश ठाकूर,शुभांगी जाधव मावशी, डॉ. आनंद गायकवाड, डॉ. एच के जगताप, डॉ.एम.जी. लोणे, कुमार विनय इंदुलकर, माजी विद्यार्थी मनोज ठाकूर, आदींनी आपल्या भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी कृतज्ञता भाव व्यक्त करताना प्रा. व्हि. एस इंदुलकर सर यांनी वर्तमान शिक्षण पद्धती,विद्यार्थ्यांची मानसिकता, त्यांच्या समोरील आव्हाने, रोजगाराच्या संधी , परदेशी विद्यापीठांची आव्हाने व स्पिरीचल शिक्षणाचे महत्त्व याविषयी आपले मत व्यक्त केले व सर्वांप्रती कृतज्ञताभाव व्यक्त केला.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची गट-क स्पर्धापरीक्षा रविवारी; 14 केंद्रांवर 4,752 परीक्षार्थी

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र लोकसेवा आयोग गट-क स्पर्धा परीक्षा-२०२६ आगामी रविवारी (दि. ६) छत्रपती संभाजीनगर जिल्हा येथील 14 केंद्रावर पार पडणार आहे. या परीक्षेसाठी जिल्ह्यातील १४ शाळा व महाविद्यालयांमध्ये एकूण ४ हजार ७५२ उमेदवारांची बैठक व्यवस्था करण्यात आली असून, परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी ४८७ अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) संगीता राठोड यांनी दिली आहे. ही महत्त्वाची स्पर्धापरीक्षा दोन सत्रांमध्ये घेतली जाणार असून सकाळचे सत्र सकाळी ११ ते दुपारी १२ आणि दुपारचे सत्र दुपारी ३ ते ४ या वेळेत पार पडेल. या परीक्षेसाठी शहरातील विविध १४ परीक्षा केंद्रांची निवड करण्यात आली आहे. परीक्षेच्या नियोजनाबाबत प्रशासनाकडून संपूर्ण तयारी करण्यात आली असून, सर्व उमेदवारांनी आयोगाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# आरोग्य सेवांच्या गुणवत्तेवर आता 'स्टार रेटिंग'ची नजर

## त्रुटी, अनियमितता आढळल्यास संबंधित संस्थांवर कडक कारवाई; आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांचा इशारा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**मुंबई** : सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत तसेच बाह्यस्रोतांमार्फत (आऊटसोर्सिंगद्वारे) पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सेवांच्या गुणवत्तेचे आता 'स्टार रेटिंग' प्रणालीद्वारे परीक्षण करण्यात येणार आहे. सेवांमध्ये गैरप्रकार, अनियमितता किंवा गुणवत्तेची कमतरता आढळल्यास संबंधित संस्थांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिला.

मुंबई येथील आरोग्यसेवा आयुक्तालयात मंत्री आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली बाह्यस्रोतांमार्फत पुरविण्यात येणाऱ्या विविध सेवांचा आढावा घेण्यासाठी बैठक झाली. यावेळी यांत्रिक धुलाई, प्रयोगशाळा सेवा, रक्त तपासणी, एक्स-रे, टेलिरॅडिओलॉजी, सीटी स्कॅन, एमआरआय, वैद्यकीय उपकरणांची देखभाल-दुरुस्ती, डायलिसिस, आहार पुरवठा, स्वच्छता व तांत्रिक सहाय्य आदी सेवांचा आढावा घेण्यात आला.



**दर्जेदार आरोग्य सेवा देणे ही प्राथमिकता**

नागरिकांना दर्जेदार आणि प्रभावी आरोग्य सेवा मिळणे ही सार्वजनिक आरोग्य विभागाची प्राथमिकता आहे. त्यामुळे बाह्यस्रोतांमार्फत दिल्या जाणाऱ्या प्रत्येक सेवेचे नियमित परीक्षण व मूल्यांकन करण्यात यावे. जिल्हा शल्यचिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सेवांची नियमित तपासणी करून गुणवत्तेचा अहवाल सादर करावा, असे निर्देश मंत्री आबिटकर यांनी दिले.

राज्यातील सार्वजनिक आरोग्य संस्थांमधील सेवांचे प्रमाणीकरण आणि गुणवत्तावाढीसाठी रुग्णालयांची 'स्टार रेटिंग' प्रणाली सुरू करण्यात आली आहे. यामध्ये विशेष वैद्यकीय सेवांची उपलब्धता, वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती, औषधांचा पुरवठा, प्रयोगशाळा सेवा, बाह्यरुग्ण व आंतररुग्ण सेवा, प्रसूती व शस्त्रक्रियांची संख्या, स्वच्छता, उपलब्ध सुविधांचा वापर तसेच रुग्णांचे अभिप्राय अशा विविध निकषांवर आरोग्य संस्थांचे मूल्यांकन केले जाणार आहे.

**महिला बचत गटांच्या माध्यमातून आहार पुरवठ्यावर भर**

राज्यातील सर्व सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये महिला बचत गटांच्या माध्यमातून सकस व आरोग्यदायी आहार पुरविण्याच्या दृष्टीने स्थानिक आमदारांच्या सहभागाने आरोग्य समित्यांच्या बैठका घेण्यात याव्यात. या बैठकीतील निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करून त्याचा अहवाल तयार करावा, असेही निर्देश देण्यात आले.

नोव्हेंबरमध्ये जनआरोग्य समितीची राज्यस्तरीय बैठक होणार आहे. त्यापूर्वी राज्यातील सर्व जनआरोग्य समित्या प्रभावीपणे कार्यान्वित असाव्यात, असेही आरोग्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

**आरोग्य डॅशबोर्डचा लोकहितासाठी वापर करा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सार्वजनिक आरोग्य विभागाच्या एकात्मिक आरोग्य डॅशबोर्ड, एकात्मिक आरोग्य सुविधा केंद्र आणि रुग्णालयांची स्टार रेटिंग प्रणाली या तीन महत्त्वपूर्ण उपक्रमांचा शुभारंभ करण्यात आला आहे. आरोग्यविषयक माहितीचे केवळ संकलन न करता तिचा लोकहितासाठी प्रभावी वापर करावा. नागरिकांना अधिक दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे शासनाचे धोरण असल्याचे मंत्री आबिटकर यांनी सांगितले.

बैठकीस आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, सचिव इ. रवींद्रन, आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, शहरी आरोग्य अभियान आयुक्त डॉ. सुनील भोकरे, रुग्णालय-आरोग्य सेवा सहसंचालक डॉ. सुनीता गोल्हाईत तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. दूरदृश्य प्रणालीद्वारे राज्यातील सर्व जिल्ह्यांचे जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, उपसंचालक आणि वैद्यकीय अधीक्षक सहभागी झाले होते.

## स्वाधार योजनेतील अर्जांच्या त्रुटी पूर्तता 10 सप्टेंबरपर्यंत करण्याचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी:** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत शासकीय वसतिगृहात प्रवेशास पात्र असूनही प्रवेश न मिळालेल्या अथवा प्रवेश न घेतलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी १० सप्टेंबरपर्यंत अर्जातील त्रुटींची पूर्तता करण्याचे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त राजू एडके यांनी केले आहे. या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य व अन्य आवश्यक सुविधांसाठी आर्थिक सहाय्य देण्यात येते. ही रक्कम विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यात थेट जमा करण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अर्जांमध्ये आढळलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याबाबत यापूर्वी वारंवार सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र, काही विद्यार्थ्यांनी अद्याप अर्जातील त्रुटींची पूर्तता केलेली नाही.

अशा विद्यार्थ्यांनी तात्काळ ऑनलाईन पद्धतीने अर्जातील त्रुटींची पूर्तता करून त्याची प्रिंट ऑफलाईन पद्धतीने संबंधित कार्यालयात सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. निर्धारित मुदतीपर्यंत या पोर्टलवर त्रुटींची पूर्तता न करणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज कायमस्वरूपी अपात्र ठरविण्यात येणार आहेत.त्यामुळे संबंधित सर्व विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत अर्जातील त्रुटींची पूर्तता करून आवश्यक कागदपत्रांसह प्रिंट कार्यालयात सादर करावी, असे आवाहन सहायक आयुक्त यांनी केले आहे.

## रोटरी क्लबतर्फे विद्यार्थ्यांना अभ्यासाचे 'आयडियाल स्टडी ॲप' वाटप

### वत्सलाबाई पाटील विद्यालयातील 700 विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा अभियानातून मार्गदर्शन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर : सप्टेंबर** : रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर इलाईटतर्फे वत्सलाबाई पाटील माध्यमिक विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी 'आयडियाल स्टडी ॲप'चे वाटप तसेच रस्ता सुरक्षा जागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शाळेतील ७०० हून अधिक विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.



आरटीओचे सहाय्यक वाहन निरीक्षक संदीप शेलार यांनी विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेचे महत्त्व पटवून देताना वाढत्या अपघातांबाबत चिंता व्यक्त केली. छत्रपती संभाजीनगरमध्ये दरवर्षी सुमारे ७५० ते ८०० जणांचा रस्ते अपघातात मृत्यू होत असल्याचे त्यांनी सांगितले. वाहनांचा अतिवेग, चुकीच्या ठिकाणी पार्किंग, मोठ्या वाहनांच्या जवळून जाताना होणारे अपघात तसेच वाहनांची योग्य देखभाल न करणे ही अपघातांची प्रमुख कारणे असल्याचे त्यांनी नमूद केले.

हेल्मेट आणि सीट बेल्टचा वापर करणे, वाहतूक नियमांचे पालन करणे तसेच वाहन चालविताना वेगावर नियंत्रण ठेवणे अत्यंत आवश्यक आहे, असे आवाहन शेलार यांनी केले. १८ वर्षांखालील मुलांनी वाहन चालवू नये, असा स्पष्ट संदेशही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. अल्पवयीन व्यक्तीने वाहन चालवून अपघात केल्यास पालकांवरही कायदेशीर कारवाई होऊ शकते. अपघातामुळे एखाद्याचा मृत्यू झाल्यास संबंधिताच्या कुटुंबावर मोठा परिणाम होण्याबरोबरच आरोपीच्या शिक्षण आणि करिअरवरही गंभीर परिणाम होऊ शकतो, त्यामुळे पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी याबाबत गांभीर्याने विचार करावा, असे त्यांनी सांगितले.

दरम्यान, लिटरसी चेअर डॉ. छाया महाजन यांच्या हस्ते दहावीच्या ४० विद्यार्थ्यांना 'आयडियाल स्टडी ॲप'चे वाटप करण्यात आले. या ॲपमध्ये मराठी व इंग्रजी माध्यमातील विविध विषयांचा अभ्यासक्रम उपलब्ध असून विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी आवश्यक मार्गदर्शन मिळणार आहे. डॉ. छाया महाजन यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाचे नियोजन व अभ्यासाची पद्धत याबाबत मार्गदर्शन केले. रोटरी क्लबच्या अध्यक्षा डॉ. माधुरी जोशी यांनी विद्यार्थ्यांना ॲपच्या वापराबाबत प्रशिक्षण दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंटरॅक्ट क्लबच्या अदिती कवठाळे आणि रिद्धी उदावंत यांनी केले. कार्यक्रमाला अध्यक्षा डॉ. माधुरी जोशी, सचिव अशोक देवरे, डॉ. छाया महाजन, संदीप शेलार, उत्तम शिरसाठ, माधुरी सांगवीकर, डॉ. अंजली भालचंद्र, विश्वास जोशी, स्वाती स्मार्त तसेच शाळेचे मुख्याध्यापक शैलेंद्र पाटील, मुख्याध्यापिका स्मिता चव्हाण, विलास बडक, ढमाले सर आणि शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील शिक्षक व रोटरी क्लबच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

## वैजापूर तालुक्यात आरोग्य सेवांचा जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडून सखोल आढावा

### 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' आणि 'तिशीचा पल्ला, तपासणी अन् सल्ला' अभियानाला गती देण्याच्या सूचना

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी वैजापूर तालुक्यातील विविध आरोग्य संस्थांना भेटी देत आरोग्य सेवांसह विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा प्रत्यक्ष आढावा घेतला. नागरिकांना सहज, सुलभ, वेळेत आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सूचना त्यांनी संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना दिल्या.



या दौऱ्यात तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे 'आपला दवाखाना', संतोषीनगर येथील 'आपला दवाखाना' तसेच दुर्गानगर आणि धरणग्रस्त नगर येथील नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रांना भेटी देण्यात आल्या.

'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासोबतच 'तिशीचा पल्ला, तपासणी अन् सल्ला' हे अभियान १ सप्टेंबर ते १० डिसेंबर २०२६ या कालावधीत प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना डॉ. धानोरकर यांनी दिल्या. ३० वर्षे व त्यावरील नागरिकांची आरोग्य तपासणी करून संभाव्य आजारांचे लवकर निदान, आवश्यक उपचार आणि आरोग्यविषयक सल्ला देण्यावर त्यांनी विशेष भर दिला.

सप्टेंबर महिन्यात गावपातळीवर आरोग्य तपासणी शिबिरे, जनजागृती, आरोग्य समुपदेशन आणि प्रतिबंधात्मक आरोग्य उपक्रम मोठ्या प्रमाणात राबविण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच आशा स्वयंसेविका, ग्रामपंचायत, अंगणवाडी आणि संबंधित विभागांच्या समन्वयातून गावोगावी आरोग्यविषयक उपक्रम प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना करण्यात आल्या.

क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमालाही गती देण्याचे निर्देश देण्यात आले. संशयित रुग्णांचा शोध, तपासणी, निदान, उपचार आणि नियमित पाठपुरावा यावर भर देताना आशा स्वयंसेविका व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून टीबी संशयितांचे सर्वेक्षण आणि आवश्यक तपासण्या प्रभावीपणे करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

याशिवाय एचएफआर व एचपीआर नोंदणी आणि संबंधित माहितीचे वेळेत व अचूक अद्ययावतीकरण, जेएसवाय योजनेतील पात्र लाभार्थ्यांना वेळेत लाभ, नियमित लसीकरण सत्रांचे प्रभावी आयोजन आणि पात्र लाभार्थ्यांचे लसीकरण पूर्ण करण्याबाबतही आढावा घेण्यात आला.

'आपला दवाखाना' येथील बाह्यरुग्ण सेवा, औषधसाठा, मनुष्यबळ, रुग्ण नोंदणी आणि उपलब्ध वैद्यकीय सुविधांची पाहणी करण्यात आली. संतोषीनगर येथील 'आपला दवाखाना' परिसरातील नागरिकांसाठी विशेष आरोग्य शिबिर आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. नागरी आरोग्य वर्धिनी केंद्रांमध्ये माहिती, शिक्षण व संवादासाठीचे साहित्य, स्वच्छता आणि नागरिकांसाठी आरोग्यदायी वातावरण राखण्याचे निर्देशही देण्यात आले. सर्व आरोग्य संस्थांनी प्रलंबित बाबींचा तातडीने निपटारा करून उद्दिष्टपूर्तीसाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे, असेही डॉ. धानोरकर यांनी सांगितले.

या क्षेत्रीय भेटीदरम्यान प्रभारी जिल्हा हिवताप अधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. राहुल चव्हाण, सांख्यिकी अन्वेषक चंदन गणोरे, प्रभारी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नायला हाशमी तसेच संबंधित आरोग्य संस्थांचे वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## लासुरगाव येथे किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळी व आरोग्य जनजागृती शिबिर

### हिमोग्लोबिन तपासणीसह स्त्रीरोग तज्ज्ञांकडून मार्गदर्शन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर (लासुरगाव)** : एचजी फाउंडेशन आणि संवेदना डेव्हलपमेंट सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने सीएसआर उपक्रमांतर्गत लासुरगाव येथील पीएम श्री माध्यमिक शाळेत किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळी व आरोग्य जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून मुलींमध्ये मासिक पाळी, स्वच्छता आणि आरोग्याबाबत शास्त्रीय दृष्टिकोन निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.



शिबिरात किशोरवयीन मुलींना मासिक पाळीदरम्यान घ्यावयाची काळजी, वैयक्तिक स्वच्छता, मासिक पाळीतील स्वच्छतेचे महत्त्व, योग्य आहार आणि मासिक पाळीशी संबंधित विविध आरोग्यविषयक समस्यांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मुलींची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. तसेच त्यांच्या आरोग्यविषयक अडचणी जाणून घेऊन वैयक्तिक समुपदेशनही करण्यात आले.

स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. ऐश्वर्या खेडकर यांनी किशोरवयीन मुलींना मासिक पाळी आणि त्यासंदर्भातील आरोग्यविषयक बाबींवर सविस्तर मार्गदर्शन केले. मुलींनी विचारलेल्या विविध प्रश्नांची उत्तरे देत त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

या वेळी संवेदना डेव्हलपमेंट सोसायटीचे व्यवस्थापक हरीश लालकर, सचिन लिमकर, सय्यद तसेच गाव प्रतिनिधी पल्लवी शेजवळ यांच्यासह शाळेतील शिक्षक आणि संबंधित मान्यवर उपस्थित होते.

किशोरवयीन मुलींमध्ये मासिक पाळीबाबत गैरसमज दूर करून योग्य व शास्त्रीय माहिती पोहोचवणे, स्वच्छतेच्या सवयी विकसित करणे आणि आरोग्याबाबत जागरूकता वाढवणे हा या शिबिराचा प्रमुख उद्देश होता.

एचजी फाउंडेशन आणि संवेदना डेव्हलपमेंट सोसायटीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिला व किशोरवयीन मुलींच्या आरोग्यासाठी विविध जनजागृती आणि आरोग्यसेवा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत.

## डिजीटल पत्रकारितेची काळाची गरज; पत्रकारांनी नवतंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करावा: उपसंचालक प्रवीण टाके

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

आजच्या वेगाने बदलणाऱ्या माध्यमांच्या जगात पारंपरिक पत्रकारितेसोबतच डिजिटल माध्यमांचे महत्त्व प्रचंड वाढले आहे. त्यामुळे पत्रकारांनी काळाची पावले ओळखून सोशल मीडिया आणि नवतंत्रज्ञानाचा अधिकाधिक प्रभावी वापर करणे ही काळाची गरज बनली आहे. माहिती व जनसंपर्क विभागही बदलत्या माध्यम व्यवस्थेनुसार आपल्या कार्यपद्धतीत सकारात्मक बदल करीत असल्याचे प्रतिपादन विभागीय माहिती कार्यालयाचे नवनियुक्त उपसंचालक प्रवीण टाके यांनी केले.



पत्रकारांशी संवाद साधताना उपसंचालक प्रवीण टाके म्हणाले की, डिजिटल माध्यमांमुळे आज पत्रकारितेचा पट अतिशय विस्तृत आणि वेगवान झाला आहे. पत्रकारांनी या डिजिटल युगातील आव्हाने स्वीकारायला हवीत आणि सोशल मीडियाचा प्रभावी वापर करावा. पत्रकारांच्या कौशल्य विकासासाठी आणि विविध विषयांवर त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे म्हणून भविष्यात विशेष प्रशिक्षणांचे आयोजन करण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. तसेच, पत्रकारांच्या दैनंदिन समस्या व अडचणी सोडवण्यास प्रशासनाचा कायम प्राधान्यक्रम राहील, असा विश्वास त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

छत्रपती संभाजीनगर विभागाचे नवनियुक्त उपसंचालक प्रवीण टाके यांची बुधवारी (दि. २) विविध वृत्तपत्रांच्या संपादक आणि पत्रकारांनी सदिच्छा भेट घेतली. या निमित्ताने दुपारी चार वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात एका विशेष संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

## उरुसानिमित्त खुलताबाद नगरपरिषदेतर्फे चादर अर्पण पारंपरिक चादर मिरवणुकीत सर्वधर्मीय एकतेचे दर्शन; 'चाऊस बँड बाजा' ठरला आकर्षण

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

**खुलताबाद** : ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व असलेल्या खुलताबाद शहरात हजरत ख्वाजा शेख मुन्तजीबोद्दीन जर जरी जर बक्ष यांच्या ७४० व्या वार्षिक उरुसानिमित्त खुलताबाद नगरपरिषदेच्या वतीने सालाबादप्रमाणे चादर मिरवणूक उत्साहात काढण्यात आली. भाविक वातावरणात निघालेल्या या मिरवणुकीत सर्वधर्मीय एकता आणि सामाजिक सलोख्याचे दर्शन घडले.



दर्गा हजरत शेख बाबा बुऱ्हनोद्दीन अवलिया यांच्या दर्ग्यासमोरून पारंपरिक पद्धतीने चादर मिरवणुकीस प्रारंभ झाला. वैजापूर येथील प्रसिद्ध 'चाऊस बँड बाजा' हे मिरवणुकीचे प्रमुख आकर्षण ठरले. बँडच्या पारंपरिक सुरांच्या तालावर निघालेल्या मिरवणुकीमुळे परिसरात उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले.

मिरवणुकीत सहभागी पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी पारंपरिक फेटे परिधान केले होते. रंगीबेरंगी फेट्यांमुळे मिरवणुकीला विशेष शोभा आली. या पारंपरिक वेशभूषेने नागरिकांचे आणि भाविकांचे लक्ष वेधून घेतले.

यावेळी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शेख समीर, नगराध्यक्ष आमेर पटेल, दर्गाह कमिटीचे अध्यक्ष एजाज अहमद, कार्यालयीन अधीक्षक रुस्तुम फुलारे, नगरसेवक अनिस जागीरदार, शेख तौसीफ अहमद, आयाज बेग, एस. एम. कमर, दर्गा कमिटीचे सचिव मतीन जागीरदार, नगरसेवक शेख सलीमोद्दीन, शेख वाजेद, शेख अमान, , शेख अनवर, डॉ. मोईनोद्दीन कादरी पाणीपुरवठा इंजिनियर श्रीहरी चौडेकर., मुख्य लिपिक अंकुश भराड पाटील जितेंद्र बोचरे, मुख्य लेखपाल किशोर मोरे सुभाष चव्हाण मनीषा लघाने संतोष भालेराव काशीम बेग शेख , मुबशीरोद्दीन, शेख कामरानोद्दीन, गुलाम मोईनोद्दीन, आप्पाराव देवकर, , कासिम बेग, शेख आतिफ, अशोक भंडारे, संजय सोंडवाल, मंगलबाई बावस्कर , अखिलोद्दीन, सतीश भालेराव, अजहर शेख, शुभम देवकर, , संतोष आव्हाड, लक्ष्मण शेजुवळ, सय्यद वसीम, खास पटेल यांच्यासह नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी तसेच शहरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

उरुसानिमित्त आयोजित करण्यात आलेली ही चादर मिरवणूक धार्मिक परंपरा, सामाजिक सलोखा आणि सर्वधर्मीय ऐक्याचे प्रतीक म्हणून ओळख असून. मिरवणुकीत नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911